दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...

■ आरएनआय : MAHMAR/2021/85884 — मंगळवार, दि. ३० डिसेंबर, २०२५ — ■ वर्ष - १ ■ अंक - ९७ ■ पाने - ४ — पुणे/पिंपरी-चिंचवड


## सुविचार

"आयुष्य आनंदी ठेवायचे असेल तर स्वाद आणि वाद या दोन्ही गोष्टींचा त्याग केला पाहिजे स्वाद सोडला शरीराला फायदा आणि वाद सोडला तर नात्याला फायदा."

## शिंदेंची सेना आक्रमक

**पुणे :** महापालिका निवडणुकीसाठी अर्ज भरण्यास फक्त एकच दिवस शिल्लक असूनही पुण्यात शिंदेंची शिवसेना आणि भाजप एकत्र लढण्याविषयी कोणतीही स्पष्टता नाही. २५ जागांसाठी आग्रही असलेल्या शिंदेंच्या शिवसेनेला भाजपकडून केवळ १५ जागांचा प्रस्ताव देण्यात आला असल्याची माहिती आहे. त्यामुळे शिवसेना आक्रमक झाल्याचं चित्र आहे. एकनाथ शिंदेंनी २५ जणांचे अर्ज भरुन घेण्याचे आदेश दिले आहेत.

## सारांश वृत्त

### अमेरिकेत अपघातात दोन महिलांचा मृत्यू

**हैदराबाद :** तेलंगणातील दोन महिलांचा अमेरिकेत झालेल्या रस्ते अपघातात मृत्यू झाला, अशी माहिती त्यांच्या कुटुंबियांना मिळाली. सोमवारी पहाटे ३ वाजता कॅलिफोर्नियातील बिशप शहरात झालेल्या कार अपघातात मेघना राणी आणि के भावना या दोघींचा मृत्यू झाला. त्या दोघीही २४ वर्षांच्या होत्या. महबूबाबाद जिल्ह्यातील गरला आणि मुल्कनूर गावातील रहिवासी असलेल्या या दोन्ही महिला उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत गेल्या होत्या.

### रेल्वे सेवा अजूनही सुरळीत नाहीच

**कोलकाता :** बिहारच्या जमुई जिल्ह्यातील सिमुलतला येथे दोन दिवसांपूर्वी एका मालगाडीचे आठ डबे रुळावरून घसरल्याने सोमवारी हावडा-पाटणा मार्गावरील रेल्वे सेवा विस्कळीत राहिली, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. पूर्व रेल्वेच्या अधिकाऱ्याने सांगितले की, दुरुस्तीचे काम जोरात सुरू आहे आणि मार्गावरील रेल्वे सेवा लवकरच पुन्हा सुरू होण्याची अपेक्षा आहे. शनिवारी रात्री मालगाडीच्या आठ डबे रुळावरून घसरल्याने अनेक एक्सप्रेस गाड्यांचे वेळापत्रक बदलण्यात आले आहे.

### 'डिजिटल अरेस्ट' प्रकरणी दोघांना अटक

**हैदराबाद :** येथील एका महिलेला १.९५ कोटी रुपयांना फसवण्यात आलेल्या 'डिजिटल अरेस्ट' सायबर फसवणुकीच्या प्रकरणात पोलिसांनी सोमवारी गुजरातमधून दोन जणांना अटक केली. ज्याने फसवणूक केलेले पैसे मिळवण्यासाठी आणि काढण्यासाठी अनेक बँक खात्यांचा वापर करून महत्त्वाची भूमिका बजावली होती, त्याला अटक करण्यात आले आहे.

## अनेक शहरांत स्वतंत्र लढतीची तयारी

# जागावाटपावरून महायुतीत तणाव...

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी : आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजप आणि शिवसेना यांच्यातील जागावाटपावरून तणाव वाढताना दिसत आहे. काही ठिकाणी युती होण्याची शक्यता असली, तरी मतभेद वाढल्याने स्वतंत्रपणे निवडणूक लढवण्याची तयारी आहे.**

अमरावती महापालिकेत शिवसेनेने भाजपकडे २५ जागांची मागणी केली होती. मात्र भाजपने हा प्रस्ताव फेटाळला. भाजपकडे एकूण ८७ जागा असताना शिवसेनेला १५ ते १६ जागा देण्याची तयारी भाजपने दर्शवली होती. त्यामुळे अमरावतीसह ठाणे जिल्ह्यातील ठाणे आणि कल्याण-डोंबिवली महापालिकांमध्ये भाजप-शिवसेना युती होण्याची शक्यता कमी असल्याचे चित्र आहे. मात्र नवी मुंबई आणि मीरा-भाईंदरमध्ये युती तुटण्याच्या मार्गावर असल्याचे संकेत मिळत आहेत. नवी मुंबईत भाजप नेते व मंत्री गणेश नाईक, तर मीरा-भाईंदरमध्ये भाजप आमदार नरेंद्र मेहता यांनी शिवसेनेला अधिक जागा देण्यास स्पष्ट नकार दिला आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेनेचे नेते व परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी भाजपला २४ तासांचा अल्टिमेटम दिला आहे. वेळेत निर्णय न झाल्यास शिवसेना स्वतंत्रपणे निवडणूक लढवण्यास सज्ज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

पनवेलमध्ये शिवसेनेने किमान १० जागांची मागणी केली असताना भाजपकडून केवळ ३ जागांची ऑफर देण्यात आली आहे. नाशिकमध्ये एकूण १२२ जागांपैकी भाजपने ५७ जागांवर दावा केल्याने महायुतीत तिढा निर्माण झाला आहे. शिवसेनेने ४६, तर राष्ट्रवादी काँग्रेसने ३० जागांची मागणी केल्यामुळे तणाव वाढला आहे. भाजपचे शहराध्यक्ष सुनील केदार यांनी शेवटच्या क्षणापर्यंत मित्रपक्षांना सोबत ठेवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले असले, तरी अंतिम निर्णय पक्षाचे वरिष्ठ नेतेच घेतील, असेही स्पष्ट केले आहे. वेळ पडल्यास सर्व १२२ जागांवर स्वतंत्रपणे निवडणूक लढवण्याची तयारी भाजपने सुरू केली आहे. जळगावमध्येही जागावाटपावर अद्याप निर्णय झालेला नाही. पुण्यात शिवसेनेचा २५ जागांवर दावा असताना भाजपने फक्त १५ जागा देण्याचा प्रस्ताव ठेवल्याने तेथील युती धोक्यात आली आहे. 'लढाई पक्की, भाजपशी युती नको' अशी भूमिका शिवसेनेचे माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी जाहीरपणे मांडली आहे. मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली आणि छत्रपती संभाजीनगरमध्ये भाजप-शिवसेना युती होण्याची शक्यता असली, तरी पुणे, नाशिक, सोलापूर, अमरावती आणि मीरा-भाईंदर या महत्त्वाच्या महापालिकांमध्ये युती फिसकटण्याची चिन्हे आहेत. युतीबाबत ठोस निर्णय न झाल्याने दोन्ही पक्षांनी स्वतंत्र निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. सोलापूरमध्ये भाजपशी बोलणी फिस्कटल्याने शिवसेनेने राष्ट्रवादी काँग्रेससोबत निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. रविवारी सोलापूर महापालिकेतील भाजप-शिवसेना युतीच्या चर्चांना पूर्णविराम मिळाला. त्यानंतर शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्यातील युतीच्या हालचालींना वेग आला आहे. सोलापूर महापालिकेतील एकूण १०२ जागांपैकी ५० ते ५५ टक्के जागांवर एकमत झाल्याचे समजते.

## ठाकरे आणि पवारांची अस्तित्वाची लढाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या दोन महत्त्वाच्या कुटुंबीय पुनर्मिलनांची चर्चा आहे. आधी ठाकरे कुटुंब आणि आता पवार कुटुंब. ही पुनर्मिलने भावनिक नाहीत, तर त्यामागे स्पष्ट राजकीय अपरिहार्यता दडलेली आहे. सततच्या अपयशांमुळे आणि कमी झालेल्या प्रभावामुळे स्वतःच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले असताना, एकत्र येण्याशिवाय पर्याय उरलेला नाही, ही जाणीव दोन्ही कुटुंबांना झाली आहे.

राज ठाकरे असोत वा उद्धव ठाकरे, तसेच शरद पवार असोत वा अजित पवार फुटीनंतर प्रत्येकाने स्वतंत्रपणे स्वतःची ताकद तपासून पाहिली. मात्र निवडणूक निकालांनी हे ठामपणे दाखवून दिले की विभक्त राहून राजकीय विश्वासार्हता टिकवणे अवघड झाले आहे. विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांत उद्धव ठाकरे यांच्या सेनेला अपेक्षित यश मिळाले नाही. दुसरीकडे, राज ठाकरे यांची मनसेही दीर्घकाळ निवडणूक अपयशात अडकलेली आहे. मागील विधानसभा निवडणुकीत मनसेच्या सर्व उमेदवारांचे डिपॉझिट जप्त होणे ही त्याची ठळक उदाहरणे आहेत. पवार कुटुंबाची कहाणीही वेगळी नाही. अजित पवार काकांपासून वेगळे झाल्यानंतर सत्तेत सहभागी झाले, मात्र हे यश टिकाऊ नसल्याची जाणीव त्यांनाही झाली. त्यामुळेच शरद पवार यांच्याशी हातमिळवणी करण्याचा निर्णय घेतला गेला.

## कल्याण-बीड-लातूर महामार्ग ६ जिल्ह्यातून जाणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** मुंबई ते मराठवाडा प्रवास हा खूप सोपा होणार आहे. कल्याण-लातूर जनकल्याण महामार्गाला मंजुरी देण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य विकास महामंडळाने द्रुतगती महामार्ग बांधण्याचा निर्णय घेतला आहे. या महामार्गामुळे मुंबई, लातूरसह अनेक जिल्ह्यांना फायदा होणार आहे. अनेक जिल्ह्यातून हा महामार्ग जाणार आहे. या महामार्गाला राज्य सरकारनेही मंजुरी दिली आहे. यानंतर एमएसआरडीसीने संरेखनाच्या कामाला सुरुवात केली आहे.

कल्याण-लातूर जनकल्याण महामार्ग ठाणे, पुणे, अहिल्यानगर, बीड, धाराशीव आणि लातूर या सहा जिल्ह्यातून जाणार आहे. सहा जिल्ह्यातील अनेक तालुक्यांना हा महामार्ग जोडला जाणार आहे. एमएसआरडीसीचा हा प्रस्तावित महामार्गाला मंजुरीचे काम गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित होते. आता संपूर्ण मराठवाड्याचा विकास होणार आहे. त्यामुळे या महामार्गाला जनकल्याण असे नाव दिले आहे. या महामार्गाचे संरेखन पूर्ण होण्यास काही दिवस लागणार आहेत. त्यानंतर प्रत्यक्षात काम सुरु होईल. कल्याण - लातूर महामार्ग कल्याण, माळशेज घाट, बीड, मांजरसूंबा येथून पुढे लातूरला जाणार असल्याचे पुढे आले आहे. त्यानंतर शेवटी महाराष्ट्र कर्नाटक सीमावर्ती भागात हा महामार्ग जाणार आहे. यामुळे उल्हासनगर, जुन्नर, अहिल्यानगर, आष्टी, पाटोदा, बीड, केज, कळंब, लातूर, निलंगा येथून हा महामार्ग जाणार आहे.

## बांगलादेशातील प्रकार उघड; अंगावर शहारे आणणारी घटना

# धक्कादायक! हिंदूंना जिवंत जाळण्याचा प्रयत्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ढाका:** बांगलादेशमध्ये अल्पसंख्याक हिंदू समाजावर होणाऱ्या हल्ल्यांची मालिका सुरुच आहे. पिरोजपुर जिल्ह्यातून एक अतिशय धक्कादायक आणि अंगावर शहारे आणणारी घटना समोर आली आहे. येथे उपद्रवी घटकांनी हिंदूंच्या ५ ते ६ घरांना लक्ष्य करत त्यांना आग लावून दिली. ही घटना घडली तेव्हा कुटुंबातील सर्व सदस्य गाढ झोपेत होते. हल्लेखोरांनी क्रूरतेचा कळस गाठत घरातील लोक बाहेर येऊ नयेत म्हणून दरवाजांना बाहेरून कड्या लावून घेतल्या होत्या.

या भीषण परिस्थितीतून कुटुंबातील सदस्यांनी कसाबसा आपला जीव वाचवला असला तरी, या घटनेने बांगलादेशातील हिंदूंच्या सुरक्षिततेबाबत पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. ही भयंकर घटना पिरोजपुर जिल्ह्यातील डुमरीतला गावात २७ डिसेंबर रोजी मध्यरात्री घडली. काही दिवसांपूर्वीच हिंदू युवक दीपू चंद्र दास याची निर्घृण हत्या करून त्याला जाळल्याची घटना ताजी असतानाच ही नवीन घटना समोर आली आहे. गावातील साहा कुटुंबासाठी ती रात्र एखाद्या भीषण स्वप्नासारखी ठरली.

मिळालेल्या माहितीनुसार, हल्लेखोरांनी पूर्ण नियोजित कट रचून घरांना घेराव घातला होता. त्यांनी घराच्या खोल्यांमध्ये कपडे कोंबून आग लावली आणि लोक बाहेर पळू नयेत यासाठी दरवाजांना बाहेरून कुलूप लावून घेतले. कुटुंबातील सदस्यांना जाग आली, तेव्हा त्यांचे घर आगीच्या भक्ष्यस्थानी पडले होते.

ज्यावेळी घरांना आग लावण्यात आली, त्यावेळी दोन घरांमध्ये मिळून हिंदू कुटुंबातील एकूण ८ सदस्य उपस्थित होते. घराच्या आत आगीच्या ज्वाळा धधकत होत्या आणि बाहेर पडण्याचे सर्व रस्ते बंद करण्यात आले होते. अक्षरशः मृत्यू डोळ्यासमोर दिसत असताना या सदस्यांनी प्रचंड धाडस दाखवले.

त्यांनी घरातील पत्रे आणि बांबूचे कुंपण तोडून कसाबसा आपला मार्ग काढला आणि बाहेर धाव घेतली. या आठ जणांचे प्राण थोडक्यात वाचले असले तरी, त्यांचे घर आणि घरात असलेले सर्व सामान जळून खाक झाले आहे. आता हे कुटुंब उघड्यावर आले आहे.

या भीषण हल्ल्यानंतर साहा कुटुंब प्रचंड दहशतीखाली आहे. त्यांच्या मनात इतकी भीती आहे की ते प्रसारमाध्यमांशी बोलायलाही तयार नाहीत. माध्यमांनी जेव्हा त्यांच्याशी फोनवरून संपर्क साधला, तेव्हा त्यांनी भीतीपोटी कोणतीही माहिती देण्यास नकार दिला. आग कशी लागली हे आम्हाला माहित नाही, असे सांगून त्यांनी आपली हतबलता व्यक्त केली. या घटनेचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, त्यामध्ये स्थानिक लोक आग विझवण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत.

घटनेची माहिती मिळताच पिरोजपुरचे पोलीस अधीक्षक मोहम्मद मंजूर अहमद सिद्दीकी यांनी घटनास्थळाला भेट देऊन पीडित कुटुंबाची विचारपूस केली आणि त्यांना न्याय मिळवून देण्याचे आश्वासन दिले. पोलिसांनी या प्रकरणात आतापर्यंत ५ संशयितांना अटक केली असून इतर आरोपींचा शोध घेतला जात आहे. बांगलादेशातील या अस्थिर परिस्थितीमुळे स्थानिक हिंदूंमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

# कुलदीप सेंगरच्या जामिनाला स्थगिती

## सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पश्चिम उन्नाव बलात्कार प्रकरणात भाजपचे हकालपट्टी केलेले नेते कुलदीप सिंह सेंगर यांना शिक्षा स्थगित करण्याच्या आणि जामीन देण्याच्या दिल्ली उच्च न्यायालयाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी स्थगिती दिली. केंद्रीय अन्वेषण ब्युरो (सीबीआय) ने दाखल केलेल्या अपीलावर न्यायालय सुनावणी करत होते.

आम्ही दिल्ली उच्च न्यायालयाच्या आदेशाला स्थगिती देतो. नोटीस जारी केली आहे, असे सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जेके माहेश्वरी आणि न्यायमूर्ती एजी मसीह यांच्या अध्यक्षतेखालील सर्वोच्च न्यायालयाच्या तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने म्हटले आहे. दिल्ली उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या आणि शिक्षा ठोठावण्याच्या



अपीलाच्या प्रलंबित कालावधीत सेंगरला जामिनावर सोडण्याच्या सीबीआयच्या याचिकेवर सीबीआयने सेंगरला नोटीस बजावली.

सुनावणीदरम्यान, सीबीआयचे सॉलिसिटर जनरल (एसजी) तुषार मेहता यांनी युक्तिवाद केला की हा एका बाल बलात्काराचा खटला असून, कलम ३७६ आयपीसी आणि पोक्सो कायद्याच्या कलम ५ आणि ६ अंतर्गत आरोप निश्चित करण्यात आले.

दिल्ली उच्च न्यायालयाने २३ डिसेंबर रोजी २०१७ च्या उन्नाव बलात्कार प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या भाजप नेते सेंगरची तुरुंगवासाची शिक्षा स्थगित केली होती. हायकोर्टाने त्यांना हालचालींवर निर्बंध आणि नियमित पोलिस रिपोर्टिंगसह कठोर अटींच्या अधीन राहून दिलासा दिला. न्यायमूर्ती सुब्रमोनियम प्रसाद आणि हरीश वैद्यनाथन शंकर यांच्या खंडपीठाने आपल्या आदेशात सेंगर यांना १५ लाख रुपयांचा वैयक्तिक जामीन आणि त्याच रकमेच्या दिल्लीस्थित तीन जामीनदारांना दिल्लीत राहण्याचे, आठवड्यातून पोलिसांना हजर राहण्याचे आणि त्यांचा पासपोर्ट जमा करण्याचे निर्देश दिले. दोन वकिलांनी दिल्ली उच्च न्यायालयाने तुरुंगवासाची शिक्षा स्थगित करण्यास आणि जामीन मंजूर करण्यास आव्हान देणारी विशेष परवानगी याचिका दाखल करून न्यायालयाचे दरवाजे ठोठावले आहेत.

## भाजपा-शिंदे गटाला धक्का

# भिडे गुरुजींचे धारकरी रिंगणात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**सांगली :** सध्या राज्यात महापालिकेच्या निवडणुकीमुळे राजकीय वर्तुळात मोठ्या घडामोडी घडत आहेत. अनेक स्थानिक बड्या नेत्यांनी आपल्या सोईच्या पक्षात प्रवेश केला आहे. एकूण २९ महानगरपालिकांसाठी येत्या १५ जानेवारी रोजी मतदान होणार आहे. तर १६ जानेवारी रोजी निकाल जाहीर केला जाईल. सांगली जिल्ह्यातील महापालिकेच्या निवडणुकीकडेही आता सर्वांचेच लक्ष लागले आहे. कारण या निवडणुकीत संभाजी भिडे गुरूजी यांच्या श्री शिवप्रतिष्ठानचे धारकरी उतरले आहेत. भाजपाकडे उमेदवारी मागूनही फक्त एकच जागा मिळाल्याने आता शिवप्रतिष्ठानच्या धारकऱ्यांनी थेट निवडणुकीच्या मैदानात उतरण्याचे ठरवले आहे. मिळालेल्या माहितीनुसार सांगली महापालिकेच्या निवडणुकीमध्ये आता हिंदुत्ववादी कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत. श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे संस्थापक संभाजी भिडे यांनी भाजपाकडे धारकऱ्यांसाठी उमेदवारीची मागणी केली होती. मात्र त्यांना एकच जागा दिल्याने धारकऱ्यांमध्ये नाराजी पसरली आहे. हिंदुत्व, लव्ह जिहाद, गोरक्षा यांसह अनेक मुद्द्यांवर शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे धारकरी काम करतात. परंतु भाजपाने समाधानकारक जागा दिल्या नाहीत. त्यामुळेच आता धारकरी या निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत.

श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे धारकरी राहुल बोळाज यांनी आपला अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी राहुल बोळाज यांनी संभाजीराव भिडे गुरुजी यांच्या हस्ते रॅलीचे उद्घाटन केले. पक्षाने आमचा विचार केला नसला तरी आम्ही अपक्ष म्हणून निवडणुकीच्या रिंगणात उतरत आहोत, असे राहुल बोळाज आणि धारकरी सुरेंद्र बोळाज यांनी सांगितले.

# मुंबईत काँग्रेसची पहिली यादी जाहीर

## मनसेचे राज ठाकरे यांचेही १८ उमेदवार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्यातील महापालिका निवडणुकांच्या उमेदवारीकडे सर्वांचे लक्ष लागले असून मुंबईत मोठे राजी-नाराजी नाट्य सुरू आहे. त्याच पार्श्वभूमीवर प्रमुख राजकीय पक्षांकडून उमेदवारांची नावे जाहीर करताना मोठी गुप्तता पाळली जात आहे.

भाजप आणि शिवसेना ठाकरे गटाने आपल्या ७० हून अधिक उमेदवारांच्या नावाची यादी जाहीर केल्यानंतर आता काँग्रेसने मुंबई महापालिकेसाठी उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. त्यामध्ये, ठाकरेंच्या बालेकिल्ल्यात म्हणजे माहिम मतदारसंघातील वार्ड १९२ मधून दीपक भिकाजी वाघमारे यांना उमेदवारी दिली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणूक २०२६ साठी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने अधिकृत उमेदवारांची पहिली यादी जाहीर करण्यात येत आहे.

निवड झालेल्या सर्व उमेदवारांचे अभिनंदन आणि शुभेच्छा. आपली मुंबई घडवूया, मुंबईच्या हितासाठी काँग्रेसला निवडूया, असे म्हणत काँग्रेसने अधिकृतपणे ट्विटर हँडलवरुन उमेदवारांच्या नावांची यादी जाहीर केली आहे.

दरम्यान, मुंबई महापालिका निवडणुकीच्या रणांगणात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आपले पहिले पाऊल टाकले आहे. राज ठाकरे यांच्या मनसेने १८ उमेदवारांची पहिली अधिकृत यादी प्रसिद्ध केली आहे. यंदा मनसे आणि उद्धव ठाकरे यांची शिवसेना (यूबीटी) एकत्र मिळून ही निवडणूक लढवत असल्यामुळे या पहिल्या यादीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया संपायला काहीच अवधी शिल्लक असताना ही घोषणा करण्यात आली आहे. राज ठाकरे हे ९ हा अंक आपल्यासाठी अत्यंत शुभ मानतात, हे सर्वांनाच ठाऊक आहे. या पहिल्या यादीतही त्याचा प्रत्यय आला आहे. मनसेने जाहीर केलेल्या उमेदवारांची संख्या १८ आहे. १ आणि ८ या अंकांची बेरीज केली असता ती ९ येते. आपल्या राजकीय आयुष्यातील महत्त्वाच्या टप्प्यावर राज ठाकरे नेहमीच या अंकाचा आधार घेताना दिसतात, त्यामुळेच ही पहिली यादीही १८ उमेदवारांचीच असल्याचे बोलले जात आहे. मराठी माणसासाठी आग्रही भूमिका घेणाऱ्या मनसेने पहिल्या यादीत 3 अमराठी उमेदवारांना स्थान दिले आहे.

## वांशिक द्वेष हा देशासाठी लज्जास्पदच

# चकमा याच्या हत्येचा थरूर यांच्याकडून निषेध

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : त्रिपुरातील विद्यार्थी एंजल चकमा याच्या देहरादूनमध्ये झालेल्या निर्घृण हत्येचा सर्वत्र निषेध होत आहे. काँग्रेसचे खासदार शशी थरूर यांनीही या हत्येविरोधात तीव्र शब्दांत आपल्या भावना व्यक्त करत, या घटनेला लज्जास्पद असे संबोधले आहे.**

देहरादूनमध्ये त्रिपुरातील विद्यार्थी एंजल चकमा याच्या निर्घृण हत्येबद्दल काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शशी थरूर यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. त्यांनी याला वांशिक द्वेष असे संबोधले असून, ही देशासाठी लज्जास्पद गोष्ट असल्याचे




म्हटले आहे. आपल्या समाजाची विचारसरणी आणि विविधतेबद्दल असंवेदनशीलता दर्शवणारी ही दुःखद बाब असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर थरूर यांनी २४ वर्षीय विद्यार्थी एंजल चकमा यांच्या मृत्यूबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले आहे. समाजात बदल होणे आवश्यक असून, कोणत्याही भारतीयाला आपल्याच देशात परकीय व्यक्तीसारखी वागणूक मिळू नये, अशी भावना त्यांनी व्यक्त केली आहे.

खासदार थरूर यांनी म्हटले आहे की, त्रिपुरातील एका तरुणाला, जो अभिमानी भारतीय होता, त्याला वांशिक भेदभावाला सामोरे जावे लागले, चिनी आणि मोमो यासारख्या अपमानास्पद शब्दांनी त्याचा संबोधले गेले आणि त्याची हत्या करण्यात आली. ही हिंसाचाराची वेगळी घटना नाही; ती अज्ञान, पूर्वग्रह आणि आपल्या समाजाच्या विविधतेला ओळखण्यात आणि त्यांचा आदर करण्यात अपयशाचे परिणाम आहे, असा आरोप त्यांनी केला.

उत्तर भारतात वंशवाद वाढत असून, हे धक्कादायक आणि लज्जास्पद असेच आहे. समृद्ध संस्कृती, भाषा आणि परंपरा असलेले ईशान्य भारत भारतीय ओळखीचा एक भाग आहे. तरीही, या प्रदेशातील नागरिकांना वांशिक भेदभाव, बहिष्कार आणि गैरवापराचा सामना करावा लागतो, हे दुर्दैवी असून असे प्रकार थांबले पाहिजेत. आपण एंजल चकमासाठी न्यायाची मागणी न्यायालयांमध्येच नाही तर देशाच्या विवेकातही केली पाहिजे. हा मृत्यू केवळ आकडेवारी किंवा मथळ्यापर्यंत मर्यादित राहू नये. त्यामुळे शिक्षण, सहानुभूती आणि सुधारणांसाठी एक चळवळ उभी राहिली पाहिजे. देशभरातील शाळांनी सर्व भारतीय समुदायांचा इतिहास आणि संस्कृती शिकवल्या पाहिजेत. माध्यमांनी ईशान्य भारतीयांना सन्मानाने चित्रित केले पाहिजे. आणि समाजाने त्यांचे पूर्वग्रह सोडून दिले पाहिजेत, असे आवाहन त्यांनी केले.

**काय आहे प्रकरण?**

त्रिपुरातील उनाकोटी जिल्ह्यातील रहिवासी एंजल चकमा हा देहरादूनमध्ये एमबीएच्या अंतिम वर्षाचा विद्यार्थी होता. ९ डिसेंबर रोजी तो त्याचा भाऊ मायकेलसोबत सेलकी बाजारात गेला होता. भेटीदरम्यान काही लोकांनी त्याला घेरले आणि त्याच्यावर वांशिक शिवीगाळ केल्याचा आरोप आहे. हल्लेखोरांनी त्याला चायनीज आणि मोमो सारखे अपमानास्पद शब्द वापरले आणि नंतर त्याच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या एंजल चकमाचा २६ डिसेंबर रोजी उपचारादरम्यान मृत्यू झाला.

## खोपोली हत्याकांडाचे बीड कनेक्शन समोर!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई:** सध्या सर्वत्र माजी नगरसेवर मंगेश काळोखे यांच्या निर्घृण हत्येची चर्चा सुरु आहे. मंगेश काळोखे हे खोपोली गावातील शिवसेना शिंदे गटाच्या नवनिर्वाचित नगरसेविका मानसी काळोखे यांचे पती होते. मंगेश यांच्यावर ५ ते ६ हल्लेखोरांनी तलवारीने जवळपास १९ ते २० वार करुन त्यांची हत्या केली. या हत्येचे बीडमधील वाल्मीक कराड याच्याशी कनेक्शन असल्याचे आमदार महेंद्र थोरवे यांनी सांगितले आहे.

आमदार महेंद्र थोरवे यांनी मंगेश काळोखे यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. तसेच त्यांनी या प्रकरणाचे बीड कनेक्शन काय आहे हे सांगितले आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी रवी देवकर याचा बॉडीगार्ड हा बीडचा असल्याचे सांगितले आहे. तसेच या बॉडीगार्डने जवळपास १९ वार करुन मंगेश काळोखे यांची हत्या केल्याचा दावा देखील केला आहे. तसेच त्याचे बड्या नेत्यांशी जवळचे संबंध असल्याचा खळबळजनक आरोप देखील महेंद्र थोरवे यांनी केले आहेत. जो रवी देवकर यांचा बॉडीगार्ड आहे (महेश धायतडक) त्यांनी मंगेशवर तेरा वार एकट्याने केले आहेत. तो जो बॉडीगार्ड आहे तो वाल्मीक कराडचा साथीदार आहे आणि कराडच्या बरोबर त्याच्या पेजवर त्याचे नाव आहे. धनंजय मुंडे सोबत गडावरचे देखील त्याचे फोटो आहेत. तो वॉन्टेड आहे. रवी देवकर यांनी खास हत्या करण्यासाठी त्याला या ठिकाणी आणलेला होता. धनंजय मुंडे, वाल्मीक कराड आणि हा रवी देवकर यांनी आणलेला बॉडीगार्डची मंगेशची क्रूर हत्या करण्यामध्ये समावेश आहे, असे आमदार महेंद्र थोरवे म्हणाले.

## संपादकीय

### पवारांचे बेरजेचे राजकारण

**अखेर दोन्ही राष्ट्रवादींनी एकत्र येण्याचा जाहीर केलेला निर्णय हा स्वागतार्ह असाच. पक्ष फुटल्यानंतर, स्वाभाविकपणे कार्यकर्तेही दुरावतात, त्यांच्यात मतभेद होतात. बेरजेचे राजकारण साधण्यासाठी पुण्यासह पिंपरी-चिंचवड पालिकेत पवार एकत्र येताहेत, त्याचे स्वागत हे करायलाच हवे.**

पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकांच्या तोंडावर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसनी ही निवडणूक एकत्र लढण्याचा निर्णय जाहीर केला. ही घटना स्थानिक राजकारणापुरती मर्यादित नसून, ती राष्ट्रवादी काँग्रेसच्या अस्तित्वाचा, विश्वासार्हतेचा आणि भवितव्याचा कस लावणारी आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटीनंतर, पक्षाने सर्वाधिक नुकसान शहरी भागात सोसले. ग्रामीण भागात शरद पवारांचे वैचारिक वजन तुलनेने आजही कायम आहे. तथापि, पुण्यासारख्या शहरी, मध्यमवर्गीय आणि राजकीयदृष्ट्या जागरूक मतदारसंघात दोन्ही राष्ट्रवादीचे कार्यकर्ते काहीसे गोंधळलेले दिसून आले. त्याचा नेमका फायदा भाजपने उचलला, तर शिंदेच्या शिवसेनेही आपापल्या परीने ही जागा भरून आपला फायदा करून घेतला. अशा परिस्थितीत दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणे ही राजकीय अपरिहार्यता होती. रोहित पवार यांनी केलेली ऐक्याची घोषणा निवडणुकीच्या बेरजेच्या राजकारणातून करण्यात आलेली आहे. दोन्ही राष्ट्रवादी एकमेकांविरोधात उभ्या राहिल्या, तर त्याचा थेट फायदा भाजपलाच होणार, हे वास्तव दोन्ही बाजूंना मान्य करावेच लागले. त्यामुळेच हा एकत्र लढण्याचा निर्णय झाला, असेही म्हणता येते. खरा प्रश्न हा आहे की, हे ऐक्य मतदारांपर्यंत किती नेमकेपणाने पोहोचणार? गेल्या दोन वर्षांत राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांच्या कार्यकर्त्यांनी एकमेकांवर केलेली टीका, आरोप-प्रत्यारोप, सत्तेसाठीची धावपळ आणि परस्परातील कटुता मतदार विसरायला तयार आहेत का? हाही प्रश्न आहे. दोन्ही पवार आज पुन्हा एकत्र आलेत, ते निवडणूक जिंकण्यासाठीच, याची त्याला पुरेपूर कल्पना आहे. याशिवाय आणखी एक कळीचा मुद्दा म्हणजे नेतृत्व. पुण्यात राष्ट्रवादीचे नेतृत्व नेमके कोणाचे, हा प्रश्न आजतरी अनुत्तरित असाच. अजित पवारांकडे सत्तेची ताकद आहे, तर शरद पवारांकडे वैचारिक भांडवल आहे. तथापि, स्थानिक प्रश्नांवर ठाम, स्पष्ट आणि सातत्याने बोलणारा चेहरा म्हणून अद्याप कोणी पुढे आलेले नाही. भाजपाने पुण्यात विकास, पायाभूत सुविधा आणि प्रशासकीय नियंत्रण यांची भाषा रूजवली आहे. राष्ट्रवादीला त्याविरुद्ध केवळ सत्ता-विरोधी सूर पुरेसा ठरणार नाही. भ्रष्टाचार, महापालिकेतील गलथान कारभार, शहराच्या वाढत्या समस्या यांवर ठोस, एकसंध भूमिका राष्ट्रवादीला मांडावी लागेल. सत्ताधारी आणि विरोधक अशा दोन्ही जबाबदाऱ्या राष्ट्रवादीला पार पाडाव्या लागतील. निवडणुका झाल्यानंतर, येणाऱ्या काळात हे ऐक्य टिकेल का, हाही महत्त्वाचा प्रश्न. उमेदवारी वाटप, प्रभागनिहाय गणित, स्थानिक नेत्यांच्या महत्त्वाकांक्षा या सगळ्यांवर नियंत्रण एकत्रित आलेल्या राष्ट्रवादीला ठेवायचे आहे. ऐक्याची भूमिका जाहीर करणे सोपे असले, तरी ते प्रत्यक्षात उतरवणे, हेच खरे पक्षांतर्गत आव्हान असेल. थोडक्यात, पुणे-पिंपरीतील राष्ट्रवादीचे ऐक्य हा पक्षाच्या बालेकिल्ल्यात अस्तित्व कायम ठेवण्यासाठीचा निर्णायक डाव असू शकतो. तो यशस्वी झाला, तर राष्ट्रवादी पक्षाला शहरी राजकारणात पुन्हा नव्याने उभारी मिळेल. अन्यथा, राष्ट्रवादीचा शहरी भागातील अधःपात हा अधिक वेगाने ठरलेला आहे. कार्यकर्त्यांचे असा आग्रह आहे की, ही निवडणूक आपण घड्याळावर लढावी, म्हणून आम्ही पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये एकत्र आलो आहोत, असे नेत्यांनी म्हटले आहे. एखाद्या पक्षात जेव्हा फूट पडते, तेव्हा कार्यकर्तेही विभागले जातात. मने दुभंगतात. घरे फुटतात. मात्र, आता पुन्हा हे दोन्ही पक्ष एकत्र आल्याने, काही अंशी स्थैर्य आणि संतुलन निर्माण होईल, हा आशावाद नक्कीच आहे. पवारांचे बेरजेचे राजकारण केवळ सत्ताकारण न ठरता, ते कार्यकर्त्यांनाही जोडणारे ठरावे, अशी अपेक्षाही अर्थातच आहे.

# देशात न्याय व्यवस्था आजही कायम आहे..!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे : उत्तर प्रदेशातील उन्नाव बलात्कार प्रकरणात दोषी असलेल्या भाजपाच्या माजी आमदाराला आज सर्वोच्च न्यायालयाने मोठा झटका दिला. माजी आमदार कुलदीप सिंह सेंगर याच्या जन्मठेपेच्या शिक्षेला दिल्ली उच्च न्यायालयाने काही दिवसांपूर्वी स्थगिती दिली होती. या निर्णयामुळे देशभरात संतापाची लाट उसळली. या प्रकरणाती पीडिता आणि तिच्या नातेवाईकांनी थेट दिल्लीत जाऊन आंदोलन केले. सोशल मीडियावरही रोष व्यक्त केला गेला. अखेर सर्वोच्च न्यायालयात आज दिल्ली उच्च न्यायालयाच्या निर्णयावर सुनावणी झाली असता सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या निर्णयाला स्थगिती दिली.**



उन्नाव प्रकरण हे सत्ता, कायदा, न्यायव्यवस्था आणि पीडितांचा संघर्ष यांचे विदारक चित्र उभे करणारे प्रकरण म्हणून म्हणता येईल. या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने केलेल्या हस्तक्षेपामुळे हा खटला पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. तो न्यायलयीन आदेशांचा वाद नसून, देशातील न्याययंत्रणा अस्तित्वात आहे का, याचा कस लावणारा निकाल म्हणून ओळखला जाईल.

२०१७ साली उत्तर प्रदेशातील उन्नाव जिल्ह्यात घडलेल्या या घटनेत एका अल्पवयीन मुलीने तत्कालीन सत्ताधारी पक्षाच्या आमदारावर, म्हणजेच कुलदीप सिंह सेंगर, याच्यावर गंभीर आरोप केले. बलात्कार, धमक्या, दबाव आणि प्रशासनाकडून दुर्लक्ष अशा धक्कादायक गोष्टी एकामागून एक उघड होत गेल्या. सुरुवातीला पोलिसांनी गुन्हा नोंदवण्यास टाळाटाळ केली, पीडितेने आत्मदहनाचा प्रयत्न केल्यानंतरच या प्रकरणाला वेग आला. हीच बाब भारतीय व्यवस्थेतील वेदनादायक बाजू दाखवणारी ठरली. त्यानंतर, हा तपास सीबीआयकडे गेला आणि त्याची सुनावणी दिल्ली येथ करण्यात आली. २०१९ मध्ये न्यायालयाने सेंगरला दोषी ठरवत आजीवन कारावासाची शिक्षा सुनावली. त्या निकालाने काही अंशी तरी समाजाचा न्यायव्यवस्थेवरील ढासळलेला विश्वास सावरला. मात्र, हा संघर्ष तिथेच थांबला नाही. शिक्षा झाल्यानंतरही कायदेशीर लढाई सुरूच राहिली आणि त्यातूनच अलीकडील वाद निर्माण झाला.

दिल्ली उच्च न्यायालयाने डिसेंबर मध्ये दिलेल्या आदेशाने या प्रकरणाला नवे वळण दिले. सजा निलंबित करून जामीन मंजूर करण्याचा निर्णय घेताना न्यायालयाने काही तांत्रिक कायदेशीर मुद्द्यांचा आधार घेतला. विशेषतः लोकसेवक या संज्ञेची मर्यादा आणि तिचा पोस्को कायद्यातील वापर, यावर न्यायालयाने मांडलेली भूमिका अनेकांना अस्वस्थ करणारी ठरली. सामान्य नागरिकांच्या नजरेत हा निर्णय म्हणजे सत्ता असलेल्यांसाठी वेगळे निकष, अशी भावना बळावण्यास कारणीभूत ठरला.

या पार्श्वभूमीवर सीबीआयने सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावले. सर्वोच्च न्यायालयाने याचे गांभीर्य लक्षात घेत, तातडीने यात हस्तक्षेप करत उच्च न्यायालयाच्या आदेशाला स्थगिती दिली आणि स्पष्ट संकेत दिले की, हा विषय केवळ तांत्रिक व्याख्यांपुरता मर्यादित नाही. सर्वोच्च न्यायालयाची भूमिका येथे महत्त्वाची ठरते. सर्वोच्च न्यायालय केवळ कायद्याचा शब्दशः अर्थ पाहत नाही, तर त्या कायद्यामागील उद्देश, सामाजिक परिणाम आणि न्यायाचा व्यापक आशय यांचा विचार करते. आमदार, मंत्री, सत्ताधारी नेते हे लोकप्रतिनिधी असतात, त्यांच्यावर जनतेचा विश्वास कायम असतो. अशा व्यक्तींना कायद्याच्या कक्षेत वेगळ्या सवलती मिळाल्या, तर कायद्याचा धाकच उरणार नाही. सर्वोच्च न्यायालयाने या मुद्द्यावर सखोल सुनावणीची तयारी दाखवणे, ही बाब न्यायव्यवस्थेसाठी निर्णायक ठरू शकते.

उन्नाव प्रकरणाचा अर्थ एका आरोपीच्या भवितव्यापुरता मर्यादित नाही. हा खटला भारतीय न्यायव्यवस्थेच्या कसोटीचा क्षण असून, कायदा हा केवळ शक्तिशालींचा युक्तिवाद ऐकत नाही, तर तो दुर्बलांच्या संरक्षणाचे साधन ठरतो का, हा प्रश्न या प्रकरणाच्या माध्यमातून ऐरणीवर आला आहे. सर्वोच्च न्यायालयाने अनेक प्रकरणात स्वतःहून हस्तक्षेप करत निकाल देण्याची परंपरा अवलंबली आहे. हा निर्णयही सर्वोच्च परंपराचा आदर करणारा आहे. न्यायालयाचा अंतिम निर्णय कायदेशीर दिशादर्शक ठरणार नाही, तर न्याय अजून जिवंत आहे, हा विश्वास कायम ठेवणारा ठरला आहे.

### तर आदेशाचे चुकीचे अर्थ लावले जातील

● विकास सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या खंडपीठाने म्हटले की, या प्रकरणात कायद्याशी संबंधित काही महत्त्वाचे प्रश्न उपस्थित झाले आहेत. दिल्ली उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालावर बोलत असताना सरन्यायाधीश म्हणाले की, या आदेशाचे भविष्यात चुकीचे अर्थ लावले जाऊ शकतात. हा निकाल स्वीकारला गेला तर उद्या एखादा हवालदार किंवा शिपाईही सार्वजनिक सेवक म्हणून पात्र ठरेल. तसेच आमदार आणि खासदार शिक्षेतून सूट मागू शकतो. यानंतर खंडपीठाने उच्च न्यायालयाचा निर्णय स्थगित करत कुलदीप सिंह सेंगरची तुरुंगातून सुटका होणार नसल्याचे म्हटले.

# निरंकारी संत समागमाच्या स्वेच्छा सेवांचा भव्य शुभारंभ

## पिंपरी-चिंचवड, पुणे शहरातून हजारो भक्त सेवांसाठी रवाना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** सतगुरु माता सुदीक्षा जी महाराज आणि आदरणीय निरंकारी राजपिता रमित जी यांच्या पावन सान्निध्यात महाराष्ट्राचा ५९वा वार्षिक निरंकारी संत समागम भव्यदिव्य स्वरुपात दिनांक २४,२५ व २६ जानेवारी, २०२६ रोजी सांगली ईश्वरपुर रोड, प्रकाश ॲग्रो समोर, लोकरे पेट्रोल पंपा नजिक, सांगलवाडी, सांगली (महाराष्ट्र) येथील विशाल मैदानांवर आयोजित करण्यात येत आहे. सत्याचा बोध प्राप्त करुन आत्ममंथन करत जीवनाची वास्तविकता जाणून मनुष्य जन्माच्या मुख्य उद्देशाकडे अग्रेसर होऊन विश्वामध्ये प्रेम, बंधुत्व, शांती व सौहार्दाचे वातावरण निर्माण करणे हा या समागमाचा मुख्य उद्देश आहे.




सुमारे ३५० एकराच्या विशाल प्रांगणात आयोजित होत असलेल्या या भव्य आध्यात्मिक आयोजनाच्या तयारीसाठी स्वैच्छिक सेवांचा विधिवत शुभारंभ संत निरंकारी मिशनच्या सेवादलाचे मुख्य संचालक श्री.एस.के.जुनेजा जी यांच्या शुभहस्ते फावड्याने मैदानावरील माती काढून करण्यात आला. या प्रेरणादायी समारोहाचा प्रारंभ सतगुरुंचा जयघोष व निराकार ईश्वराच्या प्रार्थनेने करण्यात आला. त्यानंतर हजारोंच्या संख्येने उपस्थित सेवादल स्वयंसेवकांद्वारे सतगुरु प्रार्थनेचे गायन करण्यात आले.

या प्रसंगी मिशनच्या प्रचार-प्रसार विभागाचे मेंबर इंचार्ज, मोहन छाब्रा, प्रचार विभागाचे समन्वयक हेमराज शर्मा, समागम समितीचे चेयरमन शम्भुनाथ तिवारी, समन्वयक नंदकुमार झांबरे, समितीचे अन्य सदस्य आणि महाराष्ट्रातील सर्व झोनल इंचार्ज, सर्व सेवादल क्षेत्रीय संचालक उपस्थित होते. महाराष्ट्राच्या विविध भागांतून आलेल्या हजारों निरंकारी भक्तगणांनीही या समारोहामध्ये भाग घेतला.

महाराष्ट्रात वार्षिक निरंकारी संत समागमांची परंपरा फार जुनी आहे. १९६८ मध्ये महाराष्ट्राचा पहिला संत समागम मुंबईतील प्रसिद्ध शिवाजी पार्क मैदानावर आयोजित करण्यात आला. यावर्षीच्या ५९ व्या समागमाचे आयोजन करण्याचे सौभाग्य सांगलीकरांना प्राप्त झाले आहे. समालखा (हरियाणा) येथे आयोजित विश्वस्तरिय ७८व्या वार्षिक निरंकारी संत समागमानंतर प्रतिवर्षाप्रमाणे प्रत्येक भक्त महाराष्ट्राच्या ५९व्या वार्षिक निरंकारी संत समागमाची मोठ्या आतुरतेने वाट पाहत आहेत. हा दिव्य संत समागम पूर्णपणे यशस्वी करण्यासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून तसेच पिंपरी-चिंचवड, पुणे शहरातून निरंकारी सेवादलाचे स्वयंसेवक व अन्य भक्तगण हजारोंच्या संख्येने मोठ्या श्रद्धेने समागम स्थळी येऊन तन्मयतेने समागमाच्या पूर्वतयारीसाठी आपल्या सेवा अर्पण करत राहतील.

# तर महाविकास आघाडीचे सोपस्कार कशाला?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** महाविकास आघाडीबाबत आमचा कोणताही संभ्रम नाही. मात्र, शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे चर्चेला अजित पवार यांच्यासोबत बसतात. तर मग महाविकास आघाडीचे सोपस्कार केलेच कशाला? असा सवाल उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा संपर्क नेते सचिन अहिर यांनी येथे केला.

महापालिका निवडणुकी संदर्भात आकुर्डी, शिवसेना भवन येथे शिवसेना उद्धव ठाकरे पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. यावेळी जिल्हाप्रमुख ॲड. गौतम चाबुकस्वार, युवा सेनेचे नेते चेतन पवार, उप जिल्हाप्रमुख हाजी दस्तगीर मणियार, रोमी संधू, अनिता तुतारे, माजी नगरसेवक धनंजय आल्हाट आदी उपस्थित होते. या बैठकीनंतर ते म्हणाले की, आमची पहिली अंतिम यादी सोमवारी पक्षप्रमुखांचा आदेश घेऊन जाहीर होईल.

महाविकास आघाडीची चर्चा पुढे जात नसल्याबाबत विचारले असता सचिन अहिर म्हणाले की, आमचा याबाबत कोणताही संभ्रम नाही. सत्तेत असलेल्या अजित पवार यांच्याबरोबर जाता येणार नाही अशी स्पष्ट भूमिका आम्ही मांडली. महाविकास आघाडीतील घटक पक्ष म्हणून एकत्र आले तर आम्ही बरोबर आहोत. मात्र डॉ. अमोल कोल्हे चर्चेला अजित पवारांबरोबर बसतात. पुढे जिल्हा परिषदेच्या निवडणुका आहेत. अजित पवारांशी चर्चा करायची होती तर मग महाविकास आघाडीचे सोपस्कार केलेच कशाला, असा सवाल सचिन आहेर यांनी केला. काँग्रेस, मनसेसह समविचारी पक्षांना बरोबर घेऊन जात आहोत. वंचितशीही चर्चा केली जाणार आहे अशीही माहिती त्यांनी दिली.

# प्रदूषित पाण्याला पिण्यायोग्य बनवणाऱ्या यंत्रणेचे प्रात्यक्षिक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** सध्याच्या काळात अतिशय गंभीर असलेल्या पाणी आणि हवेचे प्रदूषण या समस्यांवर अद्ययावत तंत्रज्ञानाच्या आधारे शक्य असल्याचे सिद्ध करणारे प्रात्यक्षिक 'इको आईस'च्या वतीने बोट क्लब येथे सादर करण्यात आले.

यावेळी प्रोजेक्ट ड्रॉपलेट आणि जलशुद्धी या प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात आले. प्रोजेक्ट ड्रॉपलेटद्वारे सौर ऊर्जा आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारे बोटीचा वापर करून नदी व अन्य जलस्त्रोतांमधील पाण्याची शुद्धता, प्रदूषणाचे प्रमाण आणि अन्य पर्यावरणीय परीक्षण केले जाते. पाण्यातील परिसंस्थेची संबंधित माहिती त्वरित डॅशबोर्डवर उपलब्ध होते. फ्लुईड ॲनालिटिक्सच्या सहकार्याने हा प्रकल्प विकसित करण्यात आला असून वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम कडून सन २०२४ चे को प्रोन्युअर ऑफ द इयर हे आंतरराष्ट्रीय मानांकन प्राप्त झाले आहे, अशी माहिती 'इको आईस'चे संस्थापक अध्यक्ष डॉ करण चव्हाण यांनी दिली. यावेळी विद्या प्रतिष्ठान च्या संचालक रजनी इंदुलकर, अतुल चंद्र, श्रुती बापट आदि मान्यवर उपस्थित होते. तसेच पाण्यातील दूषित भाग जाळून टाकून आरओ तंत्रज्ञानाद्वारे त्याला पिण्यायोग्य बनवणाऱ्या जलशुद्धी या यंत्रणेचे सादरीकरणही यावेळी करण्यात आले.

ही यंत्रणा घरगुती वापरापासून ते मोठ्या जलसाठ्यापर्यंत पाणी शुद्ध करण्यासाठी वापरता येणे शक्य आहे. या तंत्रज्ञानाचा वापर करून पाण्याचा पुनर्वापर करणे आणि पाणीटंचाईवर मात करणे शक्य आहे, असा दावा डॉ. चव्हाण यांनी केला. पाण्याप्रमाणेच ड्रोनचा वापर करून हवा शुद्ध करण्याचे तंत्रज्ञानही उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

# शब्द-भावना सुलेखनातून मांडून आनंद मिळवा : पालव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** शब्द लिहायचे नसतात तर त्या शब्दामागची भावना लिहायची असते. जीवनात प्रत्येकाने कोणत्या ही कलेतून व्यक्त व्हावे. आपली भाषा, आपले शब्द त्यात आपली भावना सुलेखनातून मांडून आनंद मिळवता येतो. एखाद्या आवडत्या कलेबरोबर शिकत शिकत आनंद वेचला की, जगणं सोपं होतं असे प्रसिद्ध सुलेखनकार पद्मश्री अच्युत पालव यांनी सांगितले.



निमित्त होते चिंचवड येथील एकबोटे फर्निचर स्टुडिओ मध्ये अच्युत पालव यांनी सुलेखनातून साकारलेल्या भिंतीच्या १४ व्या उत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात पालव यांनी निवडक प्रेक्षकांशी संवाद साधला. यावेळी संचालक नरेंद्र एकबोटे, सुहास एकबोटे, श्रद्धा पालव, ज्येष्ठ कलाकार विकास गायतोंडे, अमोल कुलकर्णी तसेच कला आणि विविध क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी संस्थेच्या आकर्षक दिनदर्शिकेचे प्रकाशन पालव यांच्या हस्ते करण्यात आले. कलाकार विनोद कोचर याने पालव यांचे पिंपळाच्या पानावर काढलेले चित्र त्यांना भेट देण्यात आले. श्रद्धा पालव यांनी प्रेक्षकांच्या वतीने प्रश्न विचारून अच्युत पालव यांना बोलते केले. यावेळी एक सुलेखनकार ते पद्मश्री पुरस्कार असा पालव यांचा जीवन प्रवास उपस्थिताना अनुभवता आला. गुलजार यांनी दिलेली शाब्बासकीची थाप, सुलेखन कले मुळे तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांची दिल्ली मध्ये झालेली भेट त्यांनी दिलेला आशीर्वाद असे सर्व समृद्ध अनुभव प्रेक्षकांना ऐकायला मिळाले. विकास गायतोंडे यांनी देखील पालव यांचे काही किस्से सांगितले. स्वागत सुहास एकबोटे यांनी केले, तर आभार अमोल कुलकर्णी यांनी मानले.

# महापालिका निवडणूक : मतदान प्रक्रियेसाठी प्रशिक्षणाचा दुसरा टप्पा पूर्ण

## पुढील टप्प्यातील प्रशिक्षण महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालय निहाय - उपायुक्त पंकज पाटील

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान होणार आहे. या मतदान प्रक्रियेसाठी नियुक्त मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांच्या मतदान प्रक्रिया प्रशिक्षणाचा दुसरा टप्पा आज चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह व आकुर्डी येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृह येथे तीन सत्रांमध्ये पार पडला.



या प्रशिक्षणास उप आयुक्त पंकज पाटील, विशेष अधिकारी किरण गायकवाड, मुख्य प्रशिक्षक सतीश मेहेर, रामेश्वर पवार, ईव्हीएम प्रशिक्षण देणारे आयटीआय अधिकारी यांच्यासह संबंधित समन्वय अधिकारी तसेच मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी उप आयुक्त पंकज पाटील म्हणाले, निवडणूक ही लोकशाहीमधील अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांची भूमिका निर्णायक असते. प्रत्येक अधिकाऱ्याने मतदान प्रक्रियेतील प्रत्येक टप्पा अचूकपणे समजून घेऊन राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचना आणि कायदेशीर तरतुदींचे काटेकोर पालन करणे गरजेचे आहे. ईव्हीएम हाताळणी, मॉक पोल, मतदान साहित्य व्यवस्थापन, मतदार ओळख तपासणी, मतदान केंद्रांवरील सुरक्षा व्यवस्था तसेच मतदानानंतरची कार्यवाही या सर्व बाबींबाबत सविस्तर माहिती घेणे आवश्यक आहे. निवडणूक प्रक्रियेत निष्पक्षता, पारदर्शकता आणि शिस्त राखणे ही प्रत्येक कर्मचाऱ्याची जबाबदारी आहे.

मतदान प्रक्रियेत कोणतीही शंका किंवा अडचण निर्माण झाल्यास तात्काळ वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधून नियमानुसार कार्यवाही करावी. प्रत्येक मतदान केंद्रावर शांततापूर्ण वातावरणात, निर्भय व विश्वासार्ह मतदान होईल याची खात्री करणे हेच या प्रशिक्षणाचे उद्दिष्ट आहे, यासाठी महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालय निहाय मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांना पुढील प्रशिक्षण देण्यात आहे. असेही उप आयुक्त पंकज पाटील यावेळी म्हणाले.

प्रशिक्षणात संगणकीय सादरीकरणाद्वारे (पीपीटी) प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी करावयाच्या कार्यवाहीबाबत सविस्तर तांत्रिक मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये ईव्हीएम, बॅलेट युनिट व कंट्रोल युनिट यांची जोडणी, मॉक पोल घेण्याची पद्धत, निवडणूकविषयक कायदेशीर तरतुदी, भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचना, निवडणुकीतील महत्त्वाचे बदल, टपाली मतदानाची प्रक्रिया, मतदान प्रक्रियेतील विविध टप्पे, निवडणूक साहित्य ताब्यात घेणे व तपासणी, साहित्य वितरण व स्वीकृती व्यवस्था, चिन्हांकित मतदार यादी तपासणी, मतदान यंत्रांची तपासणी आदी बाबींचा समावेश होता.

तसेच मतदान केंद्रांची उभारणी, मतदान कक्षाची रचना, मतदान केंद्रांवर आदल्या दिवशी करावयाची पूर्वतयारी, मतदान केंद्रांवर पोहोचल्यानंतर करावयाची कार्यवाही, मतदान केंद्रांवरील सुरक्षा व्यवस्था, मतदान संपल्यानंतर करावयाची कार्यवाही याबाबतही सविस्तर माहिती देण्यात आली.

याशिवाय मतदान अधिकाऱ्यांची मतदान केंद्रावरील कर्तव्ये व जबाबदाऱ्या, तसेच मतदान केंद्राध्यक्षांच्या मतदान केंद्र परिसरातील जबाबदाऱ्या, विविध टप्प्यांवरील कामांची रूपरेषा व महत्त्वाच्या प्रकरणी करावयाची कार्यवाही याबाबत अधिकारी, कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच ईव्हीएम, बॅलेट युनिट व कंट्रोल युनिट हाताळण्याबाबत प्रत्यक्ष प्रात्यक्षिकदेखील यावेळी दाखविण्यात आले. उपस्थित नागरिकांना मतदानाची शपथ देण्यात आली. "आम्ही भारताचे नागरिक लोकशाहीवर निष्ठा ठेवून मुक्त, निःपक्षपाती व शांततापूर्ण वातावरणात निर्भयपणे मतदान करू," अशी शपथ जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी वाचून दाखवली.

# विकासाच्या नावाखाली पुणेकरांचा जीव धोक्यात?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड:** शहरात राहणाऱ्या नागरिकांच्या आरोग्यासाठी एक धोक्याची घंटा वाजली आहे. गेल्या काही दिवसांपासून या भागातील प्रदूषणात प्रचंड वाढ झाली असून हवेचा दर्जा अत्यंत खालावला आहे. विशेषतः वाकड आणि हिंजवडी या आयटी हबच्या परिसरात हवा श्वास घेण्यालायक राहिलेली नाही. येथील भूमकर चौक परिसरात हवेचा गुणवत्ता निर्देशांक ३०० च्या वर गेला असून ही स्थिती मानवी आरोग्यासाठी अत्यंत घातक मानली जाते.

शहरातील या वाढत्या धुराला आणि धुळीला काही प्रमुख गोष्टी कारणीभूत ठरत आहेत. हिंजवडी आणि वाकड पट्ट्यात सध्या मोठ्या प्रमाणावर घरांची आणि व्यापारी संकुलांची बांधकामे सुरू आहेत, ज्यामुळे वातावरणात धुळीचे साम्राज्य पसरले आहे. तसेच सिमेंट कॉंक्रीट तयार करणाऱ्या प्रकल्पांतून निघणारी धूळ आणि महामार्गावरील वाहनांच्या कोंडीमुळे हवेत विषारी वायू मिसळत आहेत. पुण्याचा प्रदूषणाचा आकडा २२०वरून आता २३२ पर्यंत वाढला असून, वाकडमध्ये तर हा निर्देशांक ३०७ च्या धोकादायक पातळीवर पोहोचला आहे.

या प्रदूषित हवेमुळे नागरिकांना विविध आजारांचा सामना करावा लागत आहे. वृद्ध आणि लहान मुलेच नाही, तर तरुण मंडळींनाही खोकला, डोळ्यांची जळजळ आणि दम लागण्यासारखे त्रास जाणवू लागले आहेत. तज्ज्ञांनी इशारा दिला आहे की, फुफ्फुसांचे कायमस्वरूपी आजार होऊ शकतात. त्यामुळे लोकांनी घराबाहेर पडताना काळजी घेणे आवश्यक झाले आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### एकाच रात्रीत दोन बिबट जेरबंद

**शिक्रापूर :** शिरुर तालुक्यात अनेक ठिकाणी बिबट्याचे दर्शन होत असताना, मागील काही घटनेमुळे वनविभागाने बिबटे जेरबंद करण्याची मोहित हाती घेतलेली आहे. वनविभागाने चांडोह व फाकटेमध्ये लावलेल्या दोन पिंजऱ्यामध्ये दोन बिबटे जेरबंद करण्यात वनविभागाला यश आले आहे. शिरुर वनविभागाच्या वतीने चांडोह येथे भाऊ पानमंद यांच्या तर फाकटे येथे पोपट फिरोदिया यांच्या शेतात पिंजरा लावण्यात आला होता. आज बिबटे पिंजऱ्यात अडकल्याचे दिसून आले. दोन्ही बिबटे मादी प्रवर्गातील असून सदर बिबट्यांची रवानगी माणिकडोह येथील बिबट निवारा केंद्रात करण्यात आले असल्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे यांनी सांगितले.

### चारीतील अंध गोमातेला जिवदान

**शिक्रापूर :** आरणगाव, ता. शिरुर येथे ओढ्याजवळील खोल पाण्याच्या चारीमध्ये अडकून पडलेल्या बेवारस अंध गोमातेला जीवदान देत गोशाळेमध्ये दाखल करण्यात गोरक्षक व नागरिकांना यश आले आहे. आरणगाव येथे ओढ्याजवळील खोल पाण्याच्या चारीमध्ये एक बेवारस गोमाता चिखलामध्ये अडकून पडलेल्या नागरिकांना दिसले. सिद्धार्थ वडघुले, सागर मोरे, अंकिता मोरे, महेंद्र मोरे, तानाजी कोकाटे, बाबू चव्हाण, गणेश सोनवणे यांनी परिश्रम घेत ट्रॅक्टरच्या सहाय्याने गोमातेला बाहेर काढले. विश्व हिंदू परिषद बजरंग दल व अखिल भारत कृषी गोसेवा संघाचे आकाश पारडे, उपेंद्र बलकवडे, गौरव शिंदे, हेमंत परदेशी यांनी पुढील पालन पोषणासाठी गोमातेला पुणे येथील द मिरॅकल एनिमल रिहॅब येथे दाखल केले.

---

## माळेगाव सहकारी साखर कारखान्याला मागे टाकत आघाडी

# श्री छत्रपती कारखाना साखर उताऱ्यात जिल्ह्यात दुसरा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**भवानीनगर :** यावर्षीच्या गाळप हंगामामध्ये श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्यांने माळेगाव सहकारी साखर कारखान्याला साखर उताऱ्याच्या बाबतीत मागे टाकून, माळेगाव सहकारी साखर कारखान्यापेक्षा ०.१६ टक्क्याने जास्त साखर उतारा मिळवण्यात आघाडी घेतली आहे.




साखर कारखान्यांचा गाळप हंगाम सुरू झाला की, जिल्ह्यातील सोमेश्वर, माळेगाव व छत्रपती या साखर कारखान्यांच्या गाळपाकडे ऊस उत्पादकांचे लक्ष लागते. जिल्ह्यामध्ये सहकारी साखर कारखान्यांमध्ये सोमेश्वर सहकारी साखर कारखाना, माळेगाव सहकारी साखर कारखाना व श्री छत्रपती सहकारी साखर कारखाना हे तीन साखर कारखाने उसाचे गाळप, साखर उत्पादन व साखर उतारा मिळवणे यामध्ये आघाडीवर असतात. त्यामुळे या कारखान्यांकडे ऊस उत्पादकांचे लक्ष लागलेले असते.

साखर उताऱ्यामध्ये गेली अनेक वर्षापासून नेहमीच पिछाडीवर असणाऱ्या श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याने यावर्षी माळेगावपेक्षा जास्त उतारा मिळवून जिल्ह्यामध्ये दुसरा क्रमांक घेतला आहे.

साखर उताऱ्याच्या बाबतीत सोमेश्वर कारखाना प्रथम क्रमांकावर असून, या कारखान्याने सरासरी ११.१० टक्के साखर उतारा मिळवलेला आहे. श्री छत्रपती सहकारी कारखान्याने दुसऱ्या क्रमांकाची आघाडी मिळवत १०.८५ टक्के सरासरी राखली आहे. गाळप हंगामाच्या प्रारंभी माळेगाव कारखाना उताऱ्यामध्ये दुसऱ्या क्रमांकावर होता. डिसेंबर महिन्यामध्ये श्री छत्रपतीने आघाडी घेत डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात माळेगावपेक्षा ०.१६ टक्क्याने साखर उतारा जास्त मिळवला. माळेगाव कारखान्याने १०.६९ टक्के सरासरी उतारा मिळवला आहे. आता लवकरच छत्रपती कारखाना सोमेश्वरच्या साखर उताऱ्याच्या जवळ येणार आहे. २८ डिसेंबरला सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याला दैनंदिन साखर उतारा ११.९८, माळेगाव सहकारी साखर कारखान्याला दैनंदिन साखर उतारा ११.८५ व श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्यांला दैनंदिन साखर उतारा ११.५९ मिळाला. सोमेश्वरने आतापर्यंत ५ लाख २५ हजार ८०३ टन उसाचे गाळप करून ५ लाख ८१ हजार १०० क्विंटल साखरेचे उत्पादन केले. माळेगावने ५ लाख ६ हजार ९५४ टन उसाचे गाळप करून, ५ लाख ३२ हजार २०० क्विंटल साखरेचे उत्पादन केले, तर श्री छत्रपतीने ४ लाख ३३ हजार २९५ टन उसाचे गाळप करून, ४ लाख ६१ हजार २०० क्विंटल साखरेचे उत्पादन केले. या साखर कारखान्यांनी गाळप हंगामाचे ५६ दिवस पूर्ण केले आहेत.

श्री छत्रपती कारखान्याने डिसेंबर नंतर गाळपास येणाऱ्या पूर्व हंगामी व सुरू ऊसाला प्रति टन ७५ रुपये व खोडवा ऊसाला प्रति टन १०० रुपये अनुदान जाहीर केल्यामुळे उत्पादक सभासदांनी इतर कारखान्यांना गाळपासाठी ऊस देण्याचे टाळले आहे. त्यामुळे छत्रपती कारखान्यांमध्ये १२ लाख टनापर्यंत उसाचे गाळप होईल असा अंदाज व्यक्त होत आहे. श्री छत्रपती कारखान्याचे अध्यक्ष पृथ्वीराज जाचक यांच्या नेतृत्वाखाली गाळप हंगामाचे योग्य नियोजन झाल्यामुळेच कारखान्याला जास्तीत जास्त साखर उतारा मिळत आहे. संचालक मंडळाने १२ लाख टन गाळपाचे उद्दिष्ट ठेवले असून, पृथ्वीराज जाचक, उपाध्यक्ष कैलास गावडे यांच्यासह संचालक मंडळ कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील उसाचे गाळप आपल्याच कारखान्यात करावे असे आवाहन सभासदांना वेळोवेळी करीत आहे.

---

## लोणीतील गनिभाई हुसेन सय्यद कृषी पुरस्काराने सन्मानित



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** जय किसान फार्मर्स फोरम, गोदावरी बायो फर्टी. इंडस्ट्रिज व आमची माती आमची माणसं यांच्या संयुक्त विद्यमाने देण्यात येणाऱ्या भारताचे पहिले कृषिमंत्री कृषिरत्न डॉ.पंजाबराव देशमुख प्रेरणा पुरस्काराने लोणी (ता. आंबेगाव) येथील शेतिनिष्ठ शेतकरी गनिभाई हुसेन सय्यद यांना नाशिक येथे आमदार राहुल टिकले यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

नाशिक येथे झालेल्या कार्यक्रमास पोलिस महानिरीक्षक प्रतापराव दिघावकर, ज्येष्ठ कृषी शास्त्रज्ञ डॉ. जयराम पुरकर, मल्टिमोल मायक्रो फर्टिलायझर इंडस्ट्रिजचे शशिकांत शेट्टी, राष्ट्रीय सेवा प्रमुख विविध भारतीचे डॉ. संतोष जाधव, ओम गायत्री ग्रुपचे मधुकर गवळी, इफकोच्या संचालिका साधना जाधव, राजविलास गायकवाड, सेंद्रिय शेतीतज्ज्ञ सदुभाऊ शेळके, भारतीय अन्न महामंडळाचे सदस्य बापूसाहेब शिंदे या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सह्याद्री फार्म्सचे संस्थापक अध्यक्ष विलास शिंदे हे होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापिका शुभांगी लिंगे यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. शिक्षिका पूनम खेडकर, सुरेखा शिंदे, श्रुती भोर, प्रणाली गडकरी, पूजा भोर व अनुश्री इंदोरे यांनी नियोजन केले. शाळेच्या सल्लागार संगीता होनराव यांनी विशेष मार्गदर्शन केले.

---

## नागापूरातील गडदेवस्तीत बिबट्याचा वावर

### नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण; तातडीने उपाययोजनांची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील नागापूर गावाच्या गडदेवस्तीत गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचा वावर वाढल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सोमवारी (दि. २९) पहाटे अडीच वाजण्याच्या सुमारास बिबट्या मुक्तपणे संचार करीत असल्याचे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले. या घटनेमुळे शेतकरी वर्गात एकच खळबळ उडाली आहे.

नागापूर मधील मिंडे मळा, पवार मळा परिसरात बिबट्याचा संचार हा प्रामुख्याने रात्रीच्या वेळी होत असून आता गडदे वस्तीजवळील रस्ते, शेतजमीन तसेच घरांच्या आसपास फिरत असल्याचे संकेत राजेंद्र वाघ यांनी बसविलेल्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये आढळून आले आहे. त्यामुळे लहान मुले, महिला तसेच ज्येष्ठ नागरिकांमध्ये विशेषतः भीतीचे वातावरण पसरले आहे. अनेक नागरिकांनी रात्री घराबाहेर पडणे टाळले असून जनावरांची देखील काळजी घेतली जात आहे.

या परिसरात यापूर्वीही बिबट्याचा वावर दिसून आला होता. मात्र अलीकडेच बिबट्यांचा वावर वाढल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. शेतीला पाणी भरण्यासाठी किंवा सकाळी लवकर शेतात जाणाऱ्या शेतकऱ्यांनाही यामुळे अडचणी येत आहेत. काही नागरिकांनी बिबट्याच्या हालचालींची माहिती वनविभागाला दिली असून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात येत आहे.

दरम्यान, वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले असून रात्री एकटे बाहेर न पडणे, जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधणे तसेच बिबट्या दिसल्यास तत्काळ माहिती देण्याच्या सूचना दिल्या आहेत.

लवकरच परिसरात पिंजरा लावण्याबाबत तसेच गस्त वाढवण्याबाबत विचार केला जाईल, असेही वनविभागाकडून सांगण्यात आले आहे. बिबट्याचा वाढता वावर लक्षात घेता प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागापूरसह परिसरातील ग्रामस्थांकडून होत आहे.

---

## चैतन्य विद्यालयात इंग्रजी वक्तृत्व स्पर्धा उत्साहात संपन्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बनकरफाटा :** ओतूर येथील ग्राम विकास मंडळाच्या चैतन्य विद्यालयामध्ये ठाणे जिल्ह्याचे माजी आमदार,ओतूरचे सुपुत्र स्वर्गीय डी के राजर्षी यांच्या ४९ व्या पुण्यतिथी निमित्त इंग्रजी वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली.

दरवर्षी डिसेंबर महिन्यामध्ये शाळेतील पाचवी ते दहावीच्या तीन गटांमध्ये ही स्पर्धाआयोजित केली जाते. विद्यार्थ्यांच्या मनातील परकीय भाषेबद्दल असलेला न्यूनगंड दूर व्हावा,इंग्रजी भाषेबद्दल आवड निर्माण व्हावी या उद्देशाने ही स्पर्धा आयोजित केली जाते.

या स्पर्धेत विद्यालयातील ८० विद्यार्थी सहभागी झाले होते. तिन्ही गटांमध्ये अनुक्रमे पर्यवेक्षक अनिल उकिरडे, इंग्रजी विभाग प्रमुख भाऊसाहेब खाडे, उप मुख्याध्यापक संजय हिरे यांचे अध्यक्षतेखाली स्पर्धा संपन्न झाली. यावेळी संस्थेचे सचिव प्रदीप गाढवे, सहसचिव पंकज घोलप उपस्थित होते, अशी माहिती विद्यालयाचे इंग्रजी विभाग प्रमुख भाऊसाहेब खाडे यांनी दिली.



---

## शिरदाळे परिसरात ज्वारी काढणीला सुरवात



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** शिरदाळे (ता.आंबेगाव) येथे ज्वारी पिक काढणीला सुरवात झाली आहे. सुरवातीपासून यंदा पावसाने दमदार सुरवात केली होती. परंतु अंतिम टप्प्यात कमी झालेला पाऊस यामुळे ज्वारीला धान्य काय भरले नाही. कडबा मात्र झाला, पण धान्याचा तुटवडा निर्माण होणार आहे.

ज्या शेतकऱ्यांकडे जनावरे आहेत त्यांना चारा घेणे (कडबा ) मात्र परवडत नसून, कडब्याला चांगला बाजारभाव मिळत असल्याने जनावरे नसणाऱ्या शेतकऱ्यांना चांगला फायदा होत आहे. परंतू कडबा काढण्यासाठी देखील बरेच कष्ट असून, मजूर देखील मिळत नाहीत. जे मजूर मिळतात, ते अव्वाच्या सव्वा मजूरी-पैसे मागत असल्याने, ते देखील परवडत नसल्याचे शेतकरी सांगत आहेत. शिरदाळे परिसरात पिकणारा कडबा जनावरांना पोषक असून निरोगी असल्याने त्याला बाहेरील ठिकाणावरून चांगली मागणी आहे. खास करून बैलगाडा मालक गेल्या पंधरा दिवसांपासून रोज कडबा खरेदीसाठी येत आहेत. ते देखील चांगला भाव कडब्याला देत आहेत. अंतिम टप्प्यात पाऊस झाला असता तर भरपूर धान्य झाले असते आणि धान्याचा वर्षभराचा प्रश्न मिटला असता. आता वर्षभर धान्य विकत आणण्यावाचून पर्याय नाही. परंतू दुग्ध व्यवसायिकांना चांगला कडबा निघाल्याने उन्हाळभर चाऱ्याचा प्रश्न भेडसावणार नाही.

शिरदाळे येथील शेती म्हणजे कायमच जुगार राहिलेला आहे. यंदा खरीप हंगामात जास्त पाऊस झाला. त्यामुळे पहिले पिक पाण्यात गेले, तर ज्वारी होईल या आशेने केलेली पेरणी देखील अंतिम टप्प्यात कमी पाऊस झाल्याने धान्य येऊ शकले नाही. त्यामुळे धान्यांचा प्रश्न उभा राहिला. दूध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये गाई असल्यामुळे कडबा झाला. काही शेतकऱ्यांना कडब्याचे चांगले भाव मिळाले त्याचे देखील समाधान आहे, असे शेतकरी व माजी उपसरपंच मयुर संभाजी सरडे यांनी सांगितले.

---

## नागापूर येथील शाळेत विद्यार्थ्यांना स्वेटर वाटप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** आंबेगाव पारगाव नागापूर (ता. आंबेगाव) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या सर्व विद्यार्थ्यांना सामाजिक बांधिलकी जपत एयू बँकेच्या नारायणगाव (ता. जुन्नर) शाखेच्या वतीने मोफत स्वेटरचे वाटप करण्यात आले. थंडीच्या दिवसांत विद्यार्थ्यांना उब मिळावी व त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यात यावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

या कार्यक्रमास राष्ट्रवादी श.प.गटाचे जिल्हाध्यक्ष देवदत्त निकम, सरपंच सुनील शिंदे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणेश यादव, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग, एयू बँकेचे अधिकारी नीलेश सूर्यवंशी, सागर भोर, जयेश वाघ, तानाजी भोर, शंकर टेमगिरे, गोरक्ष भोर, भरत म्हस्के, विकास पोहकर, छाया पोहकर, शिक्षक वृंद व ग्रामस्थ उपस्थित होते. ऐन थंडीच्या काळात स्वेटर मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.

ग्रामस्थांनीही या उपक्रमाचे कौतुक करत बँकेच्या सामाजिक उपक्रमांचे स्वागत केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उदयकुमार लोंढे यांनी केले, तर आभार गीतांजली लोंढे यांनी मानले.



---

## जुन्नर येथे वादविवाद स्पर्धांना प्रतिसाद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बनकरफाटा :** श्री शिव छत्रपती महाविद्यालय जुन्नर येथे इंदिराबाई जोगळेकर वादविवाद व गटचर्चा स्पर्धा आयोजित करण्यात आली. संस्थेचे विश्वस्त अनिल काका जोगळेकर यांच्या हस्ते या स्पर्धेचे उद्घाटन झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. बी. वाघमारे व अध्यक्ष प्रतिनिधी प्रा. व्ही. बी. कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. आर.डी.चौधरी, कनिष्ठ महाविद्यालय समन्वयक व उपप्राचार्य प्रा.पी. एस. लोढा, पर्यवेक्षक प्रा एस. ए. श्रीमंते, कार्यालयीन प्रबंधक एम. डी. कोरे, एमसीव्हीसी विभाग प्रमुख प्रा. के. जी. नेटके, कला विभाग प्रमुख प्रा. आर. एस. कांबळे तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग उपस्थित होते. १९७७ पासून इंदिराबाई जोगळेकर वादविवाद व गटचर्चा स्पर्धा सुरू करण्यात येत आहे. या स्पर्धेच्या आयोजनासाठी अनिल जोगळेकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन प्रा. प्रतिक्षा सुकाळे यांनी केले.

---

## पारगाव-शिंगवे रस्त्यावर धूळ वाहन चालकांना होतोय त्रास



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील पारगाव ते शिंगवे हा महत्त्वाचा दळणवळण मार्ग सध्या धुळीमुळे नागरिकांसाठी त्रासदायक ठरत आहे. रस्त्याच्या रुंदीकरणासाठी खोदकाम केलेले आहे. त्यामुळे रस्त्याची अवस्था अत्यंत खराब झाल्याने वाहनांची ये-जा होताना, मोठ्या प्रमाणात धूळ उडत आहे. त्याचा त्रास परिसरातील रहिवासी, शालेय विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांना सहन करावा लागत आहे.

या रस्त्यावरून दररोज शेतमाल वाहतूक, दूध गाड्या, शालेय बस तसेच दुचाकी-चारचाकी वाहनांची मोठी वर्दळ असते. मात्र रस्त्यावरील खड्डे, खोदकाम यामुळे धुळीचे साम्राज्य पसरले आहे. विशेषता दुचाकी चालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्याचे खोदकाम केल्याने रस्त्याची दुरवस्था झालेली असून, हे रुंदीकरणाचे काम अतिशय संथ गतीने सुरू आहे. किमान तात्पुरत्या स्वरूपात तरी नियमित पाणी फवारणी करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

---

## निरगुडसर परिसरात गहू जोमात



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात,धामणी येथील जाधव व बढेकरमळा, लाखणगाव, निरगुडसर, पोंदेवाडी, जारकरवाडी, वाळूंजनगर, रानमळा परिसरात यंदा पावसाने लावलेली जोरदार हजेरी व सध्या पडत असलेली थंडी या पोषक वातावरणामुळे या परिसरात गव्हाचे पीक चांगले जोमात आले आहे.

ज्या शेतकऱ्यांनी लवकर गव्हाची पेरणी केली, अशा शेतकऱ्यांचे गव्हाचे पीक चांगलेच जोमात आले आहे. मात्र, ज्यांनी उशिरा पेरणी केली, अशांचे पीक कमी लागले आहे. बागायत परिसरात पाणी उपलब्ध असल्याने शेतकऱ्यांना पाण्याचा तुटवडा भासणार नाही. पण जिराईत भागातील लोणी, धामणी, वडगावपीर, मांदळेवाडी येथील शेतकऱ्यांना मात्र पाणी कमी पडण्याची शक्याता असल्याचे या परिसरातील शेतकऱ्यांनी सांगितले.

---

## आंबेगाव तालुका प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने मागणी

# निवडणुकीच्या कामातून दिव्यांगांना शिक्षकांना वगळावे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक कामातून महिला, दिव्यांग व गंभीर आजारी शिक्षकांना वगळण्यात यावे, अशी मागणी आंबेगाव तालुका प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने करण्यात आली आहे. संघाचे अध्यक्ष सचिन तोडकर व सरचिटणीस सुनील भेके यांनी तहसीलदार डॉ. सचिन वाघ यांच्याकडे याबाबत निवेदन सादर केले.



निवडणूक व जनगणना ही राष्ट्रीय कामे असल्याने प्राथमिक शिक्षकांना ती पार पाडावी लागतात. मात्र निवडणूक काळात महिला शिक्षकांना मतदान केंद्रावर मुक्कामी राहावे लागते. मतदान संपल्यानंतर उशिरापर्यंत साहित्य जमा करण्यासाठी तहसील कार्यालयात थांबावे लागल्याने रात्री घरी जाताना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे महिला शिक्षकांची गैरसोय होऊ नये, यासाठी त्यांना निवडणूक कामातून वगळावे, अशी आग्रही मागणी करण्यात आली. तसेच निवडणूक आयोगाने यापूर्वी अनेक वेळा सूचित करूनही दिव्यांग शिक्षकांची निवडणूक कामासाठी नेमणूक केली जाते. यामुळे त्यांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत असून दिव्यांग शिक्षकांनाही निवडणूक कामातून वगळावे, अशी मागणी संघाने केली आहे. शिक्षण, कृषी, विमा, बँक, महसूल, पोस्ट आदी विभागांतील १०० टक्के पुरुष कर्मचाऱ्यांच्या नेमणुका केल्यास सर्व महिला शिक्षिका, दिव्यांग व गंभीर आजारी शिक्षक, दिव्यांग व दुर्धर आजाराने ग्रस्त मुलांचे पालक शिक्षक, ३० जानेवारी २०२६ रोजी सेवानिवृत्त होणारे शिक्षक तसेच दीर्घ मुदतीच्या रजेवर असलेले शिक्षक यांना निवडणूक कामातून वगळणे शक्य होईल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. कर्मचाऱ्यांची कमतरता भासल्यास महिलांची नेमणूक आदिवासी भागात न करता स्थानिक पातळीवर, स्वतःच्या घराजवळ करावी; मात्र त्यातून गरोदर महिला, स्तनदा माता, आजारी व दीर्घ रजेवर असलेल्या महिला शिक्षकांना प्राधान्याने वगळावे, अशीही मागणी करण्यात आली. शिक्षक संघाच्या सर्व मागण्यांना तहसीलदार डॉ. सचिन वाघ यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

> “निवडणूक ही लोकशाहीची महत्त्वाची प्रक्रिया आहे; मात्र त्या प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेकडे व मानवी दृष्टीकोनाकडे दुर्लक्ष होता कामा नये. महिला शिक्षक, दिव्यांग तसेच गंभीर आजारी कर्मचाऱ्यांना निवडणूक कामातून वगळण्याची शिक्षक संघाची मागणी पूर्णपणे रास्त आहे. महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अत्यंत गंभीर असून, रात्री उशिरा मतदान साहित्य जमा करताना त्यांना होणाऱ्या अडचणी प्रशासनाने समजून घ्याव्यात.”
>
> — **रमेश येवले**, शिवसेना नेते

## सारांश वृत्त

### यात्रेकरूंच्या संख्येत लक्षणीय घट

**जम्मू :** जम्मू आणि काश्मीरमधील रियासी जिल्ह्यातील त्रिकुटा टेकड्यांवरील माता वैष्णोदेवी मंदिरात २०२५ मध्ये भाविकांची संख्या ७० लाखांपेक्षा कमी झाली, सुरक्षा-संबंधित घटनांच्या मालिकेमुळे आणि दीर्घकाळ हवामानातील व्यत्ययांमुळे वार्षिक यात्रेवर परिणाम झाल्यामुळे ही लक्षणीय घट झाली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. या वर्षी २८ डिसेंबरपर्यंत एकूण ६८.८५ लाख यात्रेकरूंनी मंदिरात दर्शन घेतले होते, तर २०२५ च्या उर्वरित दिवसांत सुमारे ७०,००० अधिक यात्रेकरू भेट देतील अशी अपेक्षा आहे.

### पयन्नूरमध्ये काँग्रेस कार्यालयाची तोडफोड

**कन्नूर (केरळ) :** उत्तर केरळ जिल्ह्यातील काँग्रेस मंडलम समितीच्या कार्यालयात अज्ञात व्यक्तींनी तोडफोड केल्याचा आरोप आहे, असे पक्षाच्या सूत्रांनी सांगितले. रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास पय्यन्नूरजवळील करिवेलूर येथील गांधी मंदिरम इमारतीत ही घटना घडल्याचा संशय आहे, जिथे काही हल्लेखोरांनी दरवाजा तोडून कार्यालयात प्रवेश केला आणि मोठ्या प्रमाणात नुकसान केले, असे त्यांनी सांगितले.



### बंगालमध्ये थंडीची लाट कायम

**कोलकाता :** पुढील एका आठवड्यात उत्तर बंगालमध्ये थंडीची लाट कायम राहण्याची शक्यता आहे, तर दोन दिवसांनी राज्याच्या दक्षिण भागात किमान तापमानात दोन-तीन अंश सेल्सिअसने वाढ होण्याची शक्यता आहे, असे आयएमडीने सांगितले. सोमवारी उत्तर बंगालमधील दार्जिलिंग या डोंगराळ शहरात राज्यातील सर्वात कमी किमान तापमान ४.६ अंश सेल्सिअस नोंदवले गेले, असे अहवालात म्हटले आहे. दक्षिण बंगालमधील बांकुरा येथे राज्यातील मैदानी प्रदेशातील सर्वात कमी किमान तापमान ९ अंश सेल्सिअस नोंदवले गेले.

### या प्रकरणाची पुढील सुनावणी २१ जानेवारी रोजी

# अरवली पर्वताच्या व्याख्येला सर्वोच्च स्थगिती

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने अरवली पर्वतरांगांची व्याख्या करणाऱ्या आदेशाला स्थगिती दिली आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी २१ जानेवारी रोजी होणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने २० नोव्हेंबर रोजी दिलेला निर्णय पुढील सुनावणीपर्यंत लागू केला जाणार नाही, असे म्हटले आहे. न्यायालयाने केंद्र आणि राज्य सरकारांना नोटीस बजावून त्यांचे उत्तर मागितले आहे. सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील तीन न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी सुरू होती.

सरन्यायाधीशांनी सांगितले की, अरावली टेकड्यांचा अभ्यास आणि सर्वेक्षण करण्यासाठी एक नवीन समिती स्थापन केली जाईल. त्यांनी असेही म्हटले की, अरावली टेकड्यांचा भाग म्हणून फक्त १०० मीटरपेक्षा उंच टेकड्यांचा विचार केल्याने बेकायदेशीर खाणकाम होईल का याचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे. अरावली टेकड्यांचा भाग नसलेले क्षेत्र ओळखण्यासाठी एक व्याख्या स्थापित करणे आवश्यक आहे, असेही न्यायालयाने म्हटले आहे.

२० नोव्हेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयाने अरवली पर्वतरांगा आणि पर्वतरांगांची एकसमान व्याख्या मंजूर केली हे लक्षात घेतले पाहिजे. न्यायालयाने दिल्ली, हरियाणा, राजस्थान आणि गुजरातमध्ये पसरलेल्या या पर्वतरांगातील खाणकामाचे भाडेपट्टे तज्ज्ञांचा अहवाल येईपर्यंत थांबवले.

अरवली पर्वतरांगेभोवतीचा सर्वात मोठा वाद म्हणजे त्याच्या भौगोलिक सीमा आणि व्याख्या. टेकड्यांची स्पष्ट व्याख्या नसल्यामुळे अनेकदा बांधकाम आणि खाणकाम नियमांचे उल्लंघन होते. यापूर्वी, न्यायालयाने अरवली पर्वतरांगेत खाणकामावर पूर्ण बंदी घालण्याविरुद्ध निर्णय दिला होता, कारण अशा बंदीमुळे बेकायदेशीर खाणकामांना चालना मिळू शकते असा विश्वास होता.

पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाच्या समितीच्या शिफारशी न्यायालयाने मान्य केल्या. समितीनुसार, "अरवली टेकड्या" म्हणजे ओळखल्या जाणाऱ्या अरवली जिल्ह्यांमधील स्थानिक सर्वात कमी बिंदूपासून १०० मीटर किंवा त्याहून अधिक उंची असलेल्या कोणत्याही भूरूपाचा परिभाषा असेल. "अरावली पर्वतरांगा" म्हणजे एकमेकांपासून ५०० मीटर अंतरावर असलेल्या दोन किंवा अधिक अशा टेकड्यांचा समूह.

दरम्यान, केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांनी सोमवारी अरवली पर्वतरांगांची एकसमान व्याख्या स्वीकारण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाला स्थगिती देण्याचे स्वागत केले आणि सरकार त्यांच्या संरक्षण आणि पुनर्संचयनासाठी वचनबद्ध असल्याचे सांगितले. पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाच्या समितीने शिफारस केलेल्या अरवली टेकड्या आणि पर्वतरांगांची एकसमान व्याख्या स्वीकारणाऱ्या २० नोव्हेंबरच्या निकालातील निर्देशांना सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली. या समस्येची सर्वसमावेशक आणि समग्र तपासणी करण्यासाठी डोमेन तज्ज्ञांचा समावेश असलेली एक उच्च-शक्तीशाली समिती स्थापन करण्याचा प्रस्तावही त्यांनी मांडला. अरवली पर्वतरांगांबद्दलच्या आदेशाला स्थगिती देण्याच्या आणि मुद्द्यांचा अभ्यास करण्यासाठी एक नवीन समिती स्थापन करण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे मी स्वागत करतो. संरक्षण आणि पुनर्संचयनात मागितलेली सर्व मदत देण्यास आम्ही वचनबद्ध आहोत, असे यादव यांनी म्हटले आहे. २० नोव्हेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयाने अरवली टेकड्या आणि पर्वतरांगांची एकसमान व्याख्या स्वीकारली आणि तज्ज्ञांचे अहवाल येईपर्यंत दिल्ली, हरियाणा, राजस्थान आणि गुजरातमधील त्याच्या क्षेत्रात नवीन खाण भाडेपट्टे देण्यास बंदी घातली. जगातील सर्वात जुन्या पर्वतीय प्रणालीचे संरक्षण करण्यासाठी अरवली पर्वतरांगांच्या व्याख्येबाबत पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाच्या समितीच्या शिफारशी सर्वोच्च न्यायालयाने स्वीकारल्या होत्या.

## खराब हवामानामुळे इंडिगोची ८० विमाने रद्द

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** खराब हवामानामुळे इंडिगोने सोमवारी त्यांच्या नेटवर्कमधील ८० उड्डाणे रद्द केली आहेत, असे कंपनीने त्यांच्या संकेतस्थळावर नमूद केले आहे. रद्द झालेल्या या ८० उड्डाणांपैकी निम्मी उड्डाणे दिल्ली विमानतळावरून आहेत. इंडिगोने प्रवाशांना सूचना जारी केल्या होत्या की दृश्यमानता कमी असल्याने, उड्डाणे रद्द केली जात आहेत.

इंडिगो वेबसाइटनुसार, मुंबई, बेंगळुरू, कोचीन, हैदराबाद, कोलकाता, अमृतसर, चंदीगड, जयपूर, देहरादून, इंदूर, पटना आणि भोपाळ यासारख्या इतर विमानतळांवरून जाणारी आणि जाणारी उड्डाणे देखील रद्द करण्यात आली आहेत.

सकाळी ११.२० वाजता एअरलाइनने म्हटले आहे की, दिल्ली आणि उत्तर भारतातील अनेक विमानतळांवर धुक्याचे वातावरण आहे, दृश्यमानता अद्याप पूर्णपणे सुधारलेली नाही. परिणामी, विमान वाहतुकीवर पूर्वीचा परिणाम दुपारपर्यंत वाढण्याची शक्यता आहे आणि काही विलंब सुरूच राहू शकतात. तथापि, एक्सवर इंडिगोने सोमवारी ८० उड्डाणे रद्द केल्याचे नमूद केलेले नाही. आम्ही तुम्हाला खात्री देतो की तुमचा प्रवास आणि आराम लक्षात घेऊन स्थिर आणि सुव्यवस्थित हालचाल सुनिश्चित करण्यासाठी विमानांचे निर्गमन आणि आगमन क्रमाने केले जात आहे, असे एअरलाइनने या सूचनांमध्ये म्हटले आहे.

या महिन्याच्या सुरुवातीला न्यायालयाने वैमानिकांसाठी कठोर उड्डाण कर्तव्य आणि विश्रांती कालावधीच्या नियमांमुळे हजारो उड्डाणे रद्द केली होती, ज्यामध्ये एका विशिष्ट दिवशी १,६०० उड्डाणे होती आणि लाखो प्रवाशांना अडकून पडावे लागले होते. इंडिगोने १० डिसेंबर रोजी धुक्याच्या हंगामाची सुरुवात झाल्यापासून मोठ्या प्रमाणात उड्डाणे रद्द केली आहेत.

## काँग्रेसला उबाठानेही दिला संघ शिस्तीचा धडा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील पक्षाने आता काँग्रेसला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडून शिकण्याचा सल्ला दिला आहे. उल्लेखनीय म्हणजे, मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते दिग्विजय सिंह यांनी अलीकडेच संघाचे कौतुक केले होते, ज्यावर अनेक पक्षाच्या नेत्यांनी आक्षेप घेतला होता.

वृत्तसंस्थेशी बोलताना, उबाठा प्रवक्ते आनंद दुबे म्हणाले, संघ देशभरातील ६०-७० लाख स्वयंसेवकांद्वारे देशाची सेवा करते. ते राजकारणात सक्रिय नसले तरी, पडद्यामागे राहून राजकीय पक्षांना पाठिंबा देतात. आम्ही म्हणेन की काँग्रेसने आरएसएसच्या संघटनेतून, शिस्तबद्धतेतून आणि मातृभूमीप्रती असलेल्या समर्पणातून शिकले पाहिजे. दिग्विजय सिंहही तेच बोलत आहेत जे इतर सर्वजण म्हणत आहेत, असे ते म्हणाले.

यावेळी त्यांनी संघाचे कौतुक केले. दुबे म्हणाले, आरएसएस ही एक सांस्कृतिक संघटना आहे जी देशाच्या परंपरा आणि वारसा पुढे नेते. तर त्यांच्यासारखे कोण असू शकते? अशी संघटना जी नरेंद्र मोदींना वर उचलू शकते आणि त्यांना पंतप्रधान बनवू शकते. अशी संघटना जी सर्व प्रमुख हिंदुत्व चळवळींमध्ये आघाडीवर आहे. आरएसएस देखील आपल्या शिवसेनेच्या चळवळींमध्ये त्यांच्यासोबत उभा आहे, असे त्यांनी सांगितले.

ते म्हणाले, काँग्रेस अशा आरएसएसकडून शिकणार नसेल, तर ती काँग्रेसकडून शिकणार आहे का? जिथे त्यांना स्वतःला माहित नाही की, काँग्रेसमध्ये कोणती शिस्त आहे, रणनीती काय आहे, त्यांच्या बैठका काय आहेत, कोण कुठे आघाडी करेल, काहीही माहिती नाही. तुम्ही देवावर अवलंबून आहात, असा टोला त्यांनी लगावला.

दिग्विजयसिंह यांनी शनिवारी आरएसएस-भाजपच्या संघटनात्मक ताकदीचे कौतुक करणारा एक जुना फोटो शेअर केला. फोटोमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी समोर बसलेले आहेत, तर भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी त्यांच्या मागे खुर्चीवर बसलेले आहेत. सिंह यांनी पोस्ट केले, मला हा फोटो क्वोरा वेबसाइटवर सापडला. तो खूप प्रभावी आहे. नेत्यांच्या पायाशी बसलेला एक तळागाळातील स्वयंसेवक आणि जनसंघ भाजप कार्यकर्ता राज्याचा मुख्यमंत्री आणि देशाचा पंतप्रधान कसा बनला, हे यातून दिसून येते. ही संघटनेची शक्ती आहे. जय सियाराम, असे त्यांनी म्हटले होते.

## जमीन बळकावली तर कठोर कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लखनौ :** मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी अधिकाऱ्यांना जमीन बळकावणाऱ्या शक्तिशाली लोकांवर आणि भूमाफियांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले.

गोरखपूरमधील जनता दर्शन कार्यक्रमादरम्यान त्यांनी सुमारे १५० लोकांच्या तक्रारी ऐकल्या आणि त्या सोडवण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले. काही व्यक्तींनी जमीन बळकावल्याच्या तक्रारींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

ते म्हणाले की, कोणताही शक्तिशाली व्यक्ती किंवा माफिया एखाद्याच्या जमिनीवर जबरदस्तीने कब्जा करत असेल, तर त्यांच्यावर शक्य तितकी कठोर कारवाई करावी. गरिबांना विस्थापित करणाऱ्यांना सोडले जाऊ नये. जिथे मोजमाप आवश्यक असेल तिथे मोजमाप करून वाद सोडवावा. कौटुंबिक वादाच्या बाबतीत, दोन्ही पक्षांशी सल्लामसलत करून तोडगा काढण्याचे निर्देश त्यांनी दिले. तीव्र थंडी असूनही, मुख्यमंत्री योगी यांनी जनता दर्शनासाठी आलेल्या तक्रारदारांशी त्यांच्या खुर्च्यांजवळ संवाद साधला. मुख्यमंत्र्यांनी सर्वांना सांगितले, काळजी करू नका, आम्ही प्रत्येक समस्या सोडवू आणि सरकार सर्वांना पूर्ण पाठिंबा देईल, असे आश्वासन त्यांनी दिले. जनता दर्शन दरम्यान, मुख्यमंत्री योगी यांनी अधिकाऱ्यांना पीडितांच्या समस्यांकडे संवेदनशील लक्ष देण्याचे आणि त्वरित, वेळेवर आणि पारदर्शकपणे निराकरण करण्याचे आवाहन केले.

मुख्यमंत्र्यांनी त्यांना आश्वासन दिले की निधीची कमतरता अडथळा ठरणार नाही. त्यांनी अधिकाऱ्यांना रुग्णालयाचा अंदाज जलदगतीने तयार करून तो सरकारला सादर करण्याचे निर्देश दिले.

मुख्यमंत्री विवेकाधीन निधीतून पुरेसा निधी उपलब्ध करून दिला जाईल. मुख्यमंत्री आणि गोरखपीठाधिश्वर योगी आदित्यनाथ यांनी सोमवारी सकाळी रुद्राभिषेक केला आणि सर्वांच्या कल्याणासाठी भगवान महादेवाला प्रार्थना केली.

### भारतावर पाण्याचे शस्त्रीकरण केल्याचा आरोप

## चिनाब प्रकल्पाने पाक संतप्त



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भारत सरकारच्या पर्यावरण विभागातील एका समितीने चिनाब नदीवरील दुलहस्ती जलविद्युत प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याच्या कामाला मंजुरी दिली आहे. या प्रकल्पाला २७ तारखेला मंजुरी देण्यात आली आणि यामुळे पाकिस्तान संतप्त झाला आहे. पाकिस्तानी खासदार आणि माजी मंत्री शेरी रहमान यांनी याबद्दल प्रश्न उपस्थित केले आहेत आणि त्यांच्या निराशेतून त्यांनी भारतावर पाण्याचे शस्त्रीकरण करण्याचा आरोप केला आहे.

रहमान म्हणाल्या की पाण्याचे शस्त्रीकरण चुकीचे आणि अस्वीकार्य आहे. हे सिंधू पाणी कराराचे उल्लंघन आहे. भारत सरकारने दुलहस्ती जलविद्युत प्रकल्प टप्पा २ ला मान्यता दिली आहे. हे चुकीचे आहे. सिंधू पाणी करारानुसार, कोणताही निर्णय एकतर्फी घेता येत नाही. सिंधू पाणी करारानुसार, चिनाब, झेलम आणि सिंधू नद्यांवर पाकिस्तानचा अधिकार आहे. रावी, बियास आणि सतलज नद्यांवर भारताचा अधिकार आहे. भारताने सिंधू पाणी करार बेकायदेशीरपणे स्थगित केला आहे. भारताने अशा अनेक वादग्रस्त प्रकल्पांच्या प्रगतीला गती दिली आहे. या प्रकल्पांमध्ये सावलकोट, रताल, बरसर, पाकल दुल, क्वार, किरू आणि कीर्थई यांचा समावेश आहे. आता, दुलहस्ती प्रकल्प टप्पा २ देखील या यादीत समाविष्ट आहे, असेही त्यांनी म्हटले आहे.

या वर्षी २२ एप्रिल रोजी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २२ पर्यटकांची हत्या करण्यात आली होती, त्यांना त्यांच्या धर्माबद्दल विचारण्यात आले होते. या हल्ल्यात पाकिस्तानी दहशतवादी सामील होते. या हल्ल्यानंतर भारताने सिंधू पाणी करार रद्द केला. या कराराअंतर्गत, भारत आता कोणत्याही नदीतून पाणी सोडण्याबाबत किंवा रोखण्याबाबत माहिती देत नाही. पाकिस्तानने याबद्दल अनेक वेळा तक्रार केली आहे, परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वतः वारंवार सांगितले आहे की पाणी आणि रक्त एकत्र वाहू शकत नाही. यावरून सिंधू पाणी करारावरील भारत सरकारची भूमिका स्पष्ट होते.

हे लक्षात घेतले पाहिजे की भारत सरकारने मंजूर केलेल्या दुलहस्ती प्रकल्पातून २६० मेगावॅट वीज निर्मिती होणार आहे. यापूर्वी, सावळकोट जलविद्युत प्रकल्प देखील त्याच नदीवर नियोजित आहे. त्याची क्षमता १८५६ किलोवॅट असल्याचे वृत्त आहे. पाकिस्तान दहशतवाद्यांच्या अड्डयांविरुद्ध कारवाई करत नाही तोपर्यंत सिंधू पाणी करारावर पाकिस्तानशी कोणतीही चर्चा होणार नाही, असे सरकारने स्पष्ट केले आहे. शिवाय, हा करार लागू केला जाणार नाही.

## काँग्रेसने घुसखोरीला प्रोत्साहन दिले : शाह

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**गुवाहाटी :** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी घुसखोरीला प्रोत्साहन दिल्याबद्दल काँग्रेसवर घणाघात केला आणि घोषणा केली की भाजपा आसाममधूनच नव्हे तर देशभरातून घुसखोरांना हाकलून लावेल.

आसामच्या नागाव जिल्ह्यात १५व्या-१६व्या शतकातील वैष्णव संत-सुधारक श्रीमंत शंकरदेव यांचे जन्मस्थान असलेल्या २२७ कोटी रुपयांच्या पुनर्विकसित बटद्रव थानच्या उद्घाटनानंतर जमावाला संबोधित करताना शाह यांनी जाहीर केले की, या पवित्र भूमीवरून मी हे सांगू इच्छितो की भाजपाचा संकल्प केवळ आसाममधूनच नव्हे तर देशभरातील प्रत्येक घुसखोराला हाकलून लावण्याचा आहे.

आसाममधील जनतेला भाजपाला पुन्हा निवडून देण्याचे त्यांनी आवाहन केले आणि पाच वर्षांत राज्याची बेकायदेशीर स्थलांतरितांची समस्येतून सुटका करण्याचे आश्वासन दिले. ते म्हणाले की बेकायदेशीर स्थलांतरित हे राष्ट्रीय सुरक्षेसाठी आणि आसामच्या संस्कृतीसाठी एक मोठा धोका आहेत. "बांगलादेशी घुसखोरांना" हाकलून लावल्याबद्दल त्यांनी मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्या नेतृत्वाखालील आसाम सरकारचे कौतुक केले. बेदखल मोहिमेद्वारे राज्यातील अंदाजे १.२९ लाख बिघा जमीन घुसखोरांपासून मुक्त करण्यात आली आहे, असे त्यांनी सांगितले. घुसखोरांनी प्रसिद्ध काझीरंगा राष्ट्रीय उद्यानातील जमीन बळकावली होती परंतु हिमंता बिस्वा सरमा यांच्या नेतृत्वाखालील आसाम सरकारने त्यांना हाकलून लावले, असे शाह म्हणाले. आसामची संस्कृती वाचवण्याचा प्रश्न होता, तेव्हा काँग्रेसने १९८३ मध्ये घुसखोरांना कायदेशीररित्या येथे स्थायिक होण्यास मदत करण्यासाठी बेकायदेशीर स्थलांतरित कायदा आणला, असे गृहमंत्र्यांनी सांगितले. भाजपाच्या नेतृत्वाखालील १० वर्षांचा काळ विकासासाठी सुवर्णकाळ होता, असे प्रतिपादन करून ते म्हणाले की, पंतप्रधान मोदी यांनी गेल्या ११ वर्षांत ३६ वेळा आसामला भेट दिली, तर त्यांचे पूर्वसुरी मनमोहन सिंग यांनी राज्यसभेत १२ वर्षे प्रतिनिधित्व करूनही १० वर्षांत सात वेळा आसामला भेट दिली, असेही ते म्हणाले.

### एर्नाकुलमच्या दोन डब्यांना आग

**विशाखापट्टणम :** सोमवारी पहाटे अनकापल्ले जिल्ह्यातील एलामानचिलीजवळ टाटानगर-एर्नाकुलम एक्सप्रेसच्या दोन डब्यांना आग लागल्याने एका प्रवाशाचा मृत्यू झाला. पोलिसांना रात्री १२.४५ वाजता घटनेची माहिती मिळाली. आग लागली तेव्हा एका बाधित डब्यात ८२ आणि दुसऱ्या डब्यात ७६ प्रवासी होते. बी१ एसी कोचमध्ये एक मृतदेह आढळला. चंद्रशेखर सुंदर असे मृताचे नाव असून, तो विजयवाडा येथील रहिवासी असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## ललित मोदीने मागितली माफी

### जय मल्ल्यासोबत पार्टीचा व्हिडिओ झाला होता प्रसिद्ध

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** आयपीएलचे संस्थापक आणि घोटाळ्यातील आरोपी ललित मोदी याने सरकारची माफी मागितली आहे. अलिकडेच त्याने लंडनमधील एका पार्टीचा एक व्हिडिओ शेअर केला आहे ज्यामध्ये तो विजय मल्ल्यासोबत दिसला होता, जो किंगफिशर एअरलाइन्सला दिलेल्या कर्जाशी संबंधित फसवणूक आणि मनी लॉँड्रिंगच्या आरोपाखाली हवा आहे. व्हिडिओमध्ये त्यांनी स्वतःचे वर्णन सर्वात मोठे फरार म्हणून केले होते. ललित मोदी याने इंस्टाग्रामवर पोस्ट केलेल्या माफीनाम्यात कारण मात्र स्पष्ट केलेले नाही. तथापि, असे मानले जाते की त्याने या व्हिडिओच्या संदर्भात माफी मागितली आहे.

ललित मोदी म्हणाला, माझ्या शब्दांमुळे कोणाचे मन दुखावले असेल तर मी माफी मागतो. मी विशेषतः भारत सरकारची माफी मागतो, ज्यांचा मला खूप आदर आहे. माझा हेतू व्हिडिओ प्रसारित करण्याचा अजिबात नव्हता. मी पुन्हा एकदा मनापासून माफी मागतो, अशा शब्दांत त्याने माफी मागितली आहे. लंडनमध्ये विजय मल्ल्याच्या ७० व्या वाढदिवसाच्या पार्टीत ललित मोदी उपस्थित होते. व्हिडिओमध्ये ललित मोदी हे म्हणताना ऐकू येतात, आपण दोन फरार आहोत, भारतातील सर्वात मोठे फरार. व्हिडिओचे शीर्षक आहे, चला भारतात पुन्हा इंटरनेटवर धुमाकूळ घालूया. माझ्या मित्र विजय मल्ल्याला वाढदिवसाच्या शुभेच्छा, असे शब्द ऐकू येतात. या पोस्टवर वापरकर्त्यांकडून तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. त्यानंतर व्हिडिओ डिलीट केला. मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले आहे की कायदेशीररित्या त्यांना भारतात आणले जाईल.

### व्याघ्र राज्यात वर्षभरात ५५ मृत्यूंची नोंद

## मध्य प्रदेशात आणखी एका वाघाचा मृत्यू

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**भोपाळ :** 'व्याघ्र राज्य' असलेल्या मध्य प्रदेशातून आणखी एका वाघाच्या मृत्यूची नोंद झाली आहे - यावेळी बुंदेलखंड प्रदेशातील सागर जिल्ह्यातून. या मृत्यूसह, २०२५ मध्ये मध्य प्रदेशात आतापर्यंत पट्टेदार मोठ्या वाघांच्या मृत्युची संख्या ५५ वर पोहोचली आहे. १९७३ मध्ये प्रोजेक्ट टायगर सुरू झाल्यापासून कोणत्याही वर्षातील ही सर्वाधिक संख्या ठरली आहे.

रविवारी सागर-धाणा रोडवरील हिलगन गावाजवळ आठ ते दहा वर्षे वयाची प्रौढ मादी वाघीण मृतावस्थेत आढळली. सागर दक्षिण वन विभागाच्या अंतर्गत धाणा वन परिक्षेत्रातून वाघाचा ताजा मृत्यू झाल्याची नोंद झाली. सकाळी वाघाचे शव दिसल्याने ग्रामस्थांनी ही बाब ताबडतोब वन विभागाच्या कर्मचाऱ्यांना कळवली. धाना वनपरिक्षेत्रपाल प्रतीक श्रीवास्तव यांच्या नेतृत्वाखाली वन विभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी घटनास्थळी तपास सुरू केला.

राज्य वन विभागातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांच्या मते, मृत मादीच्या शवविच्छेदनानंतरच मृत्यूचे खरे कारण कळेल, परंतु शरीरावर जखमांच्या खुणा किंवा संशयास्पद विषबाधेचा कोणताही पुरावा नसल्याने असे सूचित होते की परिसरातील ग्रामस्थांनी लावलेल्या विद्युत सापळ्यामुळे प्रौढ मादीला विजेचा धक्का बसला असावा. स्थानिक वन विभागाचे कर्मचारी हे देखील तपासत आहेत की वाघिणी बराच काळ त्याच भागात फिरत होती की वीरांगना दुर्गावती व्याघ्र प्रकल्प किंवा पन्ना व्याघ्र प्रकल्पासह इतर कोणत्याही ठिकाणाहून तिथे आली होती.

महत्त्वाचे म्हणजे, उपलब्ध असलेल्या माहितीनुसार , या वर्षी मध्य प्रदेशात आतापर्यंत झालेल्या ५५ वाघांच्या मृत्यूंपैकी ११ मृत्यू अनैसर्गिक आहेत, त्यापैकी सुमारे आठ मृत्यू हे गावकऱ्यांनी रानडुक्कर आणि काळवीटांपासून पिके वाचवण्यासाठी लावलेल्या विद्युत सापळ्यांमुळे किंवा वन्य प्राण्यांच्या झुडुपांच्या शिकारीमुळे झाले आहेत. मध्य प्रदेशात विजेच्या धक्क्याने वाघांचे होणारे मृत्यू हे राज्य वन विभागासाठी चिंतेचे एक प्रमुख कारण आहे, विशेषतः गावकऱ्यांनी रानडुक्कर आणि काळवीटांपासून पिके वाचवण्यासाठी असे सापळे लावल्यामुळे - विशेषतः वन्य प्राण्यांमुळे झालेल्या नुकसानीमुळे महसूल विभागाकडून नुकसानभरपाई मिळण्याची प्रक्रिया खूपच मंद आणि गुंतागुंतीची आहे.